※ आचरणांत आणण्यास अत्यंत सुलभ असलेली पण परिणामीं अत्यंत प्रभावी ठरणारी साधना कोणती असेल तर ती म्हणजे............

# नाम-स्मरण

**श्रीस्वामी शिवानंद,** (आनंद-कुटीर, हृषीकेश)

आपलें मन पूर्ण ताब्यांत आणून खऱ्या सुखाचें मूळ शोधून काढणें हें आपलें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. यासाठीं सदैव नामस्मरणाचें व्रत आचरा. नामजपानें तुमचें मन तुमच्या ताब्यांत राहील आणि सत्यसुखाचा झरा तुमच्या हातीं येईल. परंतु याकरतां लागणारी श्रद्धा किती थोड्या लोकांच्या अंगीं असते! थोडेसे लोक नामजप सुरू करतात. दोनतीन महिने हा जप चालू ठेवतात. पण तेवढ्या अवधींत त्यांना नोकरींत बढती मिळाली नाहीं अथवा त्यांचा उद्योगधंदा दुप्पट फायद्याचा झाला नाहीं तर त्यांची मंत्रावरील श्रद्धा डळमळून कोसळून पडते आणि ते जप अजीबात सोडून देतात. ईश्वराच्या नामामध्यें फार मोठी अचिंत्य अशी शक्ति आहे. त्या नामाचा जप सदैव चालू ठेवला पाहिजे. आपलीं किती पातकें आणि दुष्ट संस्कार धुऊन टाकायला हवे असतात याची तुम्हांला माहिती नाहीं. सरकारी नोकरींत एखाद्या सामान्य अधिकाराची जागा मिळविण्यासाठीं तुम्हांला किती वर्षें धडपड नि खटपट करावी लागते ती जरा आठवा!

ईश्वर हें आपलें परम साध्य आहे. त्या ईश्वराचें नांव तुमच्या मनांत सतत घोळत राहूं द्या. सकाळीं उठतांक्षणींच उपनिषदांतलें एखादें वाक्य मनांत आणून त्याचें चिंतन करा. **यो वै भूमा तत्सुखम् नाल्पे सुखमस्ति।**—तो अनंत हाच खरोखरी सुखनिधान आहे. या क्षुद्र, मर्यादित, भंगुर वस्तूंत सुखाचा लवलेश नाहीं. **एको देवः सर्वभूतेषु गूढः।**—तो एक ईश्वर सर्व भूतादि व्यापून राहिलेला आहे. ईश्वराच्या सर्व नामरूपांमध्यें प्रेम, प्रकाश, ज्ञान आणि आनंद ओतप्रोत भरून राहिलेला आहे.

आज अज्ञानामुळें आपण म्हणजे वस्तुतः कोण याचा तुम्हांला विसर पडलेला आहे. अज्ञानामुळें हा देह म्हणजे आपण असें तुम्ही मानीत आहां. वस्तुतः हें जग राग-द्वेषांनीं भरलेलें आहे. झाडें, इमारती, नद्या, पर्वत यांचा समुच्चय म्हणजे वस्तुतः जग नव्हे. राग-द्वेष हे जगाचे घटक आहेत. अज्ञानामुळें राग-द्वेष निर्माण होतात, आणि हे राग-द्वेष जन्ममरणाच्या संसारचक्रांत तुम्हांला गुरफटवून टाकतात. यामुळेंच तुम्हांला अनेकवार देह घ्यावा लागतो. या अज्ञानाचें मूळच जर तुम्हीं उपटून टाकलेंत

तर तुमचा भवताप आपोआपच संपला असें समजा. याकरतां उपनिषदांचा अभ्यास करा, योगाचा आचार करा, आणि मुक्ति संपादन करून घ्या.

योग म्हणजे एखाद्या गिरिकंदरांत जाऊन आचरण्याची गोष्ट नव्हे. आपलीं एकूणएक कर्में ईश्वरचरणीं समर्पण करून टाकणें, हा योगाचा सर्वश्रेष्ठ प्रकार आहे. एकमेव ईश्वराच्या उत्कट जाणिवेनें अंतःकरणपूर्वक म्हणा, 'ईश्वराची ही पूजा आहे या भावनेनें माझीं सर्व कर्में मी त्याच्या चरणीं अर्पण करतों.' तुम्हांला ईश्वरदर्शन हवें असेल तर सर्व कर्में ईश्वरार्पण करणें हें सर्वथा आवश्यक आहे आणि एवढेंच ईश्वर-दर्शनासाठीं पुरेसें आहे पण मायेचा मोह असा जबरदस्त आहे; कीं, या गोष्टीचा तुम्हांला पुन्हां पुन्हां विसर पडेल. म्हणून हा मुद्दा तुम्हीं कटाक्षानें नित्य स्मरणांत वागविण्याचा अभ्यास केला पाहिजे. यासाठीं सदोदित सावधान राहा, नित्य देवाला आळवा.

हा भाव कायम राखण्याचें अत्यंत सुलभ साधन म्हणजे नामस्मरण. नामस्मरणानें देवाची आठवण तुमच्या मनांत सदैव जागृत राहील. सदोदित राम-मंत्राचा जप चालू ठेवा. नामजपामुळें तुमचें मन अखंड ईश्वर-चिंतन करीत राहील. 'सोऽहम्' अथवा 'अहं ब्रह्मास्मि' या मंत्राच्या तोडीचाच राममंत्रहि आहे. राममंत्र हा इतर कोणत्याहि मंत्राहून उणा नाहीं. रामनाम तुम्हांला आपल्या श्रेष्ठतम ध्येयाची प्राप्ति करून देईल; तुम्हांला सच्चिदानंदस्वरूप परमात्म्याचा साक्षात्कार घडवील.

तुम्हीं एक आध्यात्मिक दैनंदिनी ठेवली पाहिजे. साधनेला पुरेसा वेळ मिळत नाहीं अशी तक्रार कधींहि करूं नका. वायफळ चकाट्या पिटण्यांत तुम्ही किती वेळ घाल-वितां तो एकदां नीट मोजून पहा. हा वेळ असा फुकट न दवडतां जर तुम्हीं कारणीं लावलात तर साधनेला तुम्हांला हवा तितका वेळ मिळूं शकेल. तुम्ही म्हणतां कीं, चोहों-बाजूंनीं या संसाराचा जंजाळ तुम्हांला नको जीव करून टाकीत आहे. त्यावर मी असें म्हणतों कीं, तुमच्या या असंख्य जंजाळांत मंत्रजप आणि ध्यान यांचा आणखी एकच जंजाळ लावून घ्या. या जंजाळाचें सामर्थ्य असें आहे कीं, तो तुमचे बाकीचे सर्व जंजाळ नाहींसे करून टाकील. या संसारांत नित्यसमाधान आणि नित्यसुख यांची प्राप्ति होणें सर्वथैव अशक्य आहे, ही धगधगीत जाणीव तुमच्या चित्तांत उत्पन्न झाली म्हणजेच अध्यात्माच्या मार्गावर तुमचें पहिलें पाऊल पडेल. नित्यसुख आणि नित्य समाधान यांची प्राप्ति होण्याचें साधन म्हणजे नाम-जप, नामसंकीर्तन हें होय. मन आणि इंद्रियें यांना आंवरून संयम मिळवा, गीता-भागवतादि शास्त्रांचा अभ्यास करा, निष्काम सेवेमध्यें स्वतःला सर्वस्वीं वाहून घ्या. आपलीं यच्चयावत् कर्में म्हणजे त्या सर्वव्यापी अनंताची पूजा आहे, असा दृढ भाव मनांत ठेवा. असें केलेंत म्हणजे तुमच्या हातून घडणारी प्रत्येक कृति ही योगरूप बनून जाईल.

आज विद्यापीठांतून तुम्ही जें शिक्षण घेतां त्या शिक्षणामुळें मध्यान्हप्रहरीं चार घांस मिळण्याची तरतूद होते. पण 'यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह' अशा

अनिर्वचनीय परमानंदाचा अनुभव कसा मिळवावा याची शिकवण तुम्हांला विद्यापीठांतील शिक्षणांत मिळत नाहीं. वैराग्य, विवेक, शम, दम, तितिक्षा, उपरति, श्रद्धा, समाधान आणि मुमुक्षुत्व–हीं अंगीं बाणविण्याचा तुम्हीं प्रयत्न केला पाहिजे. अलीकडे समाधान या शब्दाचा अर्थसुद्धां लोकांना समजत नाहींसा झाला आहे.

अनेक जन्मीं तुम्हीं निष्काम सेवा केली असेल तर ईश्वरकृपेनें तुम्हांला नित्यानित्य विवेक करण्याची पात्रता येईल. आज तुमच्या विवेक–विचारावर मायेचीं दाट पुटें आलेलीं आहेत. मन अनेकविध अशुद्ध विचारांनीं कांठोकांठ भरलेलें असल्यामुळें, या चराचर विश्वाला प्रकाश देणाऱ्या प्रकाशमयाचें रूप मनाला दिसत नाहीं. संतत नामस्मरणाच्या योगानें चित्त शुद्ध करा. सद्‌गुण आचरणांत आणून मनाचें मालिन्य घालवून तें पवित्र बनवा. मुमुक्षा, त्याग, भक्ति आणि ध्यान—या चार शब्दांत साधनेचा सर्व प्रपंच सामावलेला आहे. या साधनेचा अवलंब करा आणि श्रवण, मनन व निदिध्यास यांच्या साहाय्यानें आपलें परमध्येय प्राप्त करून घ्या.

[आपल्या ६७ व्या वाढदिवशीं स्वामीजींनीं केलेल्या भाषणाचा सारांश.]

* श्री रामनामें द्वय अक्षर क्षराक्षरातीत पर ।
रामनाम स्मरं निरंतर । पावन नर तिहीं लोकीं ॥

—भावार्थ रामायण

आर. एन्. शिंदे ॲण्ड सन्स्
चष्म्यांचे व्यापारी
मुख्य दुकान : २०७, गिरगांव रोड, मुंबई ४
शाखा : [१] चामार बाग रोड परळ, मुंबई १२.
[२] मुकुंद मॅनशन न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई २८

# रामायणाचा भारतावरील प्रभाव

पं. जवाहरलाल नेहरू

रामायण आणि महाभारत ह्या भारताच्या प्राचीन महाकाव्यांना बहुधा शेंकडों वर्षें आकार येत होता. मागाहूनहि त्यांत मधूनमधून भर पडत गेली असावी. भारतीय आर्यांच्या प्रारंभींच्या जीवनाचें वर्णन या काव्यांत आहे. आर्यांचा अधिकाधिक प्रसार होत असतांना आणि जिंकलेल्या प्रदेशांत आपलें प्रभुत्व ते संघटित करीत असतांना त्यांनीं मिळविलेले विजय आणि त्यांचीं आपसांत झालेलीं यादवी युद्धें यांचा वृत्तांत या काव्यांमधून आढळतो. या दोन काव्यग्रंथांनीं भारतीय जनमनावर जो प्रभाव पाडला आहे तसा सतत आणि सर्वव्यापी प्रभाव गाजविणारा दुसरा एकहि ग्रंथ जगाच्या सर्व इतिहासांत इतरत्र कोठेंहि मला आढळून आलेला नाहीं. अत्यंत प्राचीनतम काळांत तयार झालेल्या या महाकाव्यांनीं भारतीय जनमनाची विलक्षण पकड घेतलेली असून, आजहि भारतीयांच्या जीवनांत हीं महाकाव्यें म्हणजे जिवंत शक्ति आहे. मूळ संस्कृतमधून या काव्यांचा अभ्यास करणारे पंडित थोडेच असले तरी भाषांतरें, अनुवाद आणि परंपरा व आख्यायिका यांच्या विविध मार्गांनीं हीं काव्यें भारतीय जनसमाजांत खोलवर पसरलीं असून त्यांच्या धाग्यांनीं भारतीय जीवनपट विणला गेलेला आहे. उत्तुंग प्रतिभेच्या पंडितापासून तों अगदीं साध्यासुध्या निरक्षर व अशिक्षित खेडुतापर्यंत, संस्कृति-विकासाच्या सर्व थरांना, ज्याला जें मानवेल त्याला तें आवश्यक व उपकारक ज्ञान देण्याची विशिष्ट भारतीय पद्धति कशी असते हें पाहावयाचें झाल्यास या महाकाव्यांकडे पाहावें. अनेक रूढि आणि उच्चनीच जाती यांनीं विभागलेल्या बहुरंगी समाजाला प्राचीन भारतीयांनीं एकसंघ कसें राखलें याचें रहस्य या महाकाव्यांच्या द्वारां आपणाला थोडेंसें समजूं शकतें. भिन्नभिन्न समाजांत सुसंवाद राखून या सर्वांना एक उदात्त परंपरा आणि नैतिक जीवनक्रम हीं प्राचीन भारतीयांनीं कशीं प्राप्त करून दिलीं याचें थोडेंसें दर्शन या महाकाव्यांमध्यें होतें. लोकांमध्यें सर्वांना समान अशी एक जीवनाविषयक दृष्टि त्यांनीं विचारपूर्वक तयार केली आहे. अनेक वादळांतहि ही जीवनदृष्टि टिकली आहे; सर्व तऱ्हेच्या भिन्नतेला ती पुरून उरली आहे.

मी माझें बाळपण आठवतों तेव्हां अगदीं पहिल्या अशा कोणत्या आठवणी मला स्मरत असतील तर त्या म्हणजे रामायण-महाभारतांतील कथांच्या. माझी आई आणि घरांतील इतर वृद्ध स्त्रिया मला या कथा सांगत असत. या कथांतून मला साहस आणि परीकथांचें वैचित्र्य या दोहोंचा आढळ होई. तसेंच रामायण-कथेवर आधारलेलीं नाटकें अथवा रामलीला-समारंभ होत तेथेंहि प्रतिवर्षी मला घेऊन जात असत.

हजारोंचे समुदाय या समारंभांना जमत आणि मोठ्यामोठ्या मिरवणुका निघत. रामायणाचें नाट्यरूप दर्शन असे ओबडधोबडच. परंतु तें फारसें महत्त्वाचें नव्हतें; कारण प्रत्येकाला राम–कथा तोंडपाठ असे आणि मोठ्या समारंभांत सर्व कांहीं साजून जात असे.

या रीतीनें भारतीय पुराण–कथा आणि जुनी परंपरा यांनीं माझ्या मनांत प्रवेश मिळविला. माझ्या मनांत जी एकंदर कल्पनासृष्टि निर्माण झाली तींत या कथा आणि परंपरा यांचाहि समावेश झालेला आहे.........इतर अनेक प्रकारच्या देशोदेशींच्या कथा माझ्या मनांत सरमिसळ दाटीवाटीनें घर करून राहिल्या असल्या तरी माझ्या बाळपणीं ज्या भारतीय पुराणांतील कथा मीं आत्मसात् केल्या होत्या त्यांचा संस्कार बीजरूपानें माझ्या मनावर कायमचा होऊन राहिला आहे.

अनेक प्रकारचे भिन्नभिन्न संस्कार होऊनहि माझ्या मनाची जर ही स्थिति, तर इतरांच्या मनांवर प्राचीन पुराणें आणि प्राचीन परंपरा यांचा केवढा मोठा प्रभाव कायम राहात असला पाहिजे याची मला यथार्थ जाणीव झाली. विशेषतः निरक्षर अशा आपल्या प्रचंड बहुजनसमाजावर या कथांचा व परंपरेचा किती प्रभाव असेल हें मला समजून चुकलें. या कथांचा प्रभाव हा अत्यंत इष्ट आहे; सांस्कृतिक आणि नैतिक अशा दोन्ही दृष्टींनीं हा प्रभाव चांगला आहे. हा प्रभाव नाहींसा करणें मला तिळमात्र रुचणार नाहीं. या कथा आणि रूपकें यांमध्यें जें सौंदर्य व्यक्त झालेलें आहे, जी कल्पनारम्य प्रतीकसृष्टि निर्माण झालेली आहे, ती नाहींशी झालेली मला कधींहि पाहवणार नाहीं.

× × ×

मी भारतांत ज्या ज्या ठिकाणीं गेलों तेथें तेथें जनतेच्या मनावर प्रबळ प्रभाव गाजविणारी एक समान सांस्कृतिक पार्श्वभूमी रुजलेली मला आढळली आहे. सोपें साधें तत्त्वज्ञान, परंपरा, इतिहास व कथा-पुराणें यांच्या संमिश्रणानें ही पार्श्वभूमी तयार झाली आहे. या विविध गोष्टी परस्परांत इतक्या एकजीव होऊन गेल्या आहेत कीं त्यांतील कोणत्याहि दोन गोष्टींची सीमारेषा ठरविणें अशक्यप्राय आहे. अगदीं अशिक्षित व निरक्षर माणसांतहि ही पार्श्वभूमी असलेली मला आढळली. रामायण-महाभारतादि ग्रंथांचा विविधरूपांनीं समाजाच्या सर्व थरांपर्यंत खोलवर प्रसार झालेला आहे. या कथांतील प्रत्येक प्रसंग आणि त्याचें तात्पर्य यांचा भारतीय जनमनावर खोल ठसा उमटलेला आहे, त्यांनीं भारतीय जीवन सार्थ आणि समृद्ध केलें आहे. निरक्षर खेडुतांनाहि शेंकडों श्लोक–पदें तोंडपाठ येत असतात. संभाषण करीत असतांना सहज बोलतांबोलतां असा एखादा निरक्षर माणूसहि जुन्या अभिजात काव्यग्रंथांतल्या एखाद्या श्लोकाचा उल्लेख करील किंवा एखादी गोष्ट व तिचें तात्पर्य आधारादाखल सांगेल. चालू घडामोडींच्या गोष्टी चाललेल्या असतांना कधींकधीं खेडुत मंडळी त्या गोष्टींना असें एखादें वाङ्मयीन वळण देत कीं तें पाहून तें पाहून मी थक्क होऊन जात असें. माझें मन हें लिखित इतिहास आणि कमी–अधिक

पणें तावूनसुलाखून घेतलेलें सत्य यांनीं भरलेलें असलें तरी मला एवढें कळून चुकलें कीं अगदीं निरक्षर शेतकऱ्याचें मनहि अनेकविध चित्रांनीं समृद्ध झालेलें आहे. हीं चित्रें पुराणें, परंपरा आणि महाकाव्यांतील धीरोदात्त नरनारींचीं चरित्रें यांमधून त्यानें मिळविलेलीं असलीं आणि प्रत्यक्ष इतिहासांतील फारच थोडीं दृश्यें त्याच्या मनांत तरळत असलीं तरी त्याच्या मनांतील चित्र–संपदा उत्कटपणांत कांहीं उणी नसते.

× × ×

मिशेले नांवाचा फ्रेंच इतिहासकार १८६४ सालीं लिहितांना रामायणाविषयीं म्हणतो– 'ज्यानें ज्यानें विशाल आकांक्षा धरली आहे अथवा अविरत कार्य केलें आहे त्यानें त्यानें या मोठ्या पेल्यांतून जीवन आणि तारुण्य यांचें मनसोक्त प्राशन करावें... पश्चिमेंतील प्रत्येक गोष्ट संकुचित आहे. ग्रीस एवढेंसें चिमुकलें राष्ट्र, तेथें माझा जीव गुदमरतो. ज्युडिया अगदीं रुक्ष, त्यांत माझा जीव तडफडतो. उत्तुंग आशिया आणि सखोल पूर्व यांच्याकडे मला क्षणभर दृष्टिक्षेप करूं द्या. इकडे मला तें महान् काव्य आढळतें. हें महाकाव्य हिंदी महासागरासारखें विस्तीर्ण आहे. सूर्यकिरणांत चमचमणाऱ्या सागरलहरीप्रमाणेंच तें दीप्तिमान् आहे. ज्याच्यांत विसंवादाचा लवलेश नाहीं अशा दिव्य सुस्वरतेनें ओतप्रोत भरलेला हा ग्रंथ आहे. इथें उदात्त शांतीचें साम्राज्य तुम्हांला आढळतें. या ठिकाणींच संघर्षांच्या ऐनभरांत अमित माधुर्याचा तुम्हांला प्रत्यय येतो. येथें मर्यादारहित बंधुतेचा आढळ होतो. ही भ्रातृभावना संपूर्ण प्राणिजात व्यापून राहिलेली तुम्हांला दिसते. हा काव्यग्रंथ म्हणजे प्रेम, कारुण्य आणि सहिष्णुता यांचा अमित सागर आहे.'

---

## लेखकासाठीं सूचना

(१) लेख पानाच्या एकाच बाजूला सुवाच्य अक्षरांत शाईनें लिहिलेला असावा. डाव्या बाजूला भरपूर मार्जिन सोडावी.


(२) लेख, कविता वगैरे साहित्य प्रसिद्धीकरितां स्वीकारणें किंवा न स्वीकारणें अगर त्यांत थोडाफार बदल करणें हा अधिकार सर्वस्वीं संपादकांचा आहे. न स्वीकारलेले लेख परत पाहिजे असल्यास पुरेसें पोष्टेज पाठवावें. नापसंत लेख तीन महिन्यांनंतर निकालांत काढण्यांत येतील.

(३) लेखकानें आपलें पूर्ण नांव व पत्ता कळवावा. टोपण नांवानें लेख प्रसिद्ध करावयाचा असला तरीही पूर्ण नांव व पत्ता ऑफिसच्या माहितीकरतां कळविणें जरूर आहे.

(४) स्वीकृत लेख अंकांत प्रसिद्ध झाल्यावर यथाशक्ति मोबदला देण्यांत येईल.

—संपादक

# कौसल्यामातेला रामाचा उपदेश





★

एके दिवशीं रामचंद्र एकान्तांत ध्यानस्थ बसला आहे असें पाहून कौसल्या तेथें गेली. आपला पुत्र साक्षात् विष्णु आहे ही गोष्ट तिला माहीत होती. भक्तियुक्त अंतःकरणानें रामाला नमस्कार करून कौसल्या म्हणाली, 'हे भगवंता, रामचंद्रा! तूं अनादि व अनंत आहेस. तूंच हीं सर्व जगतें निर्माण केलीं आहेस. तुलाच पूर्णानंद, परमात्मा, पुरुष, ईश्वर असें म्हणतात. माझें पूर्वजन्मींचें पुण्य मोठें, म्हणूनच तूं माझ्या पोटीं जन्माला आलास–बाळ, मी आतां वृद्ध झालें आहें, माझा अंतकाळ समीप आला आहे. पण अजून मी अज्ञानीच आहें. माझीं संसारबंधनें अद्यापि तुटलेलीं नाहींत. यासाठीं संसारनाश करणारें ज्ञान मला सांग. मी अज्ञानी आहें म्हणून मला जो कांहीं उपदेश करायचा तो थोडक्यांत पण नीट समजेल असा सांग.'

राम हा मोठा मातृभक्त होता. आपल्या आईला वैराग्य प्राप्त झालें आहे हें पाहून त्या दयाशील रामचंद्रानें आपल्या वृद्ध मातेला उपदेश करण्यास प्रारंभ केला. श्रीरामचंद्र म्हणाला,

'आई, मोक्षप्राप्तीचे तीन मार्ग मीं तुला पूर्वी सांगितलेले आहेत. भक्तियोग, कर्मयोग आणि ज्ञानयोग हे ते मार्ग होत. सत्व, रज आणि तम या तीन गुणामुळें भक्ति तीन प्रकारची होते. ज्याचा जसा स्वभाव असेल तशीं त्याच्याकडून सात्विक, राजस किंवा तामस भक्ति होत असते. हिंसा, दंभ, मत्सर, शत्रुमित्रभाव, विषयांवर अत्यंत आसक्ति, इत्यादि दोष हातून घडत असतां जो साधेल तशी भक्ति करीत असतो, त्याची ती भक्ति ही तामस भक्ति होय. द्रव्य, स्त्री, पुत्र, कीर्ति, अनेक प्रकारचे भोग इत्यादि प्राप्त व्हावेत अशी इच्छा धरून आणि माझें उपास्य दैवत वेगळें असें मानून जो माझी भक्ति करतो त्याची ती भक्ति राजस समजावी. केवळ आपल्या पापाचा नाश व्हावा एवढ्याच बुद्धीनें, फलाची इच्छा सोडून अभेद बुद्धीनें, केवळ भक्ति करणें हें आपलें काम आहे अशा भावनेनें भक्ति जो करतो, त्याची ती भक्ति ही सात्विक होय. गंगेचें पाणी समुद्रांत मिळालें म्हणजे तें समुद्ररूप होऊन जातें, त्याप्रमाणें केवळ माझ्याच गुणांचें चिंतन करीत ज्याची मनोवृत्ति सर्वदा माझ्याच ठिकाणीं एकरूप झालेली असते, त्याची ती भक्ति निर्गुण भक्ति होय. फलाची इच्छा किंवा कोणताहि हेतु मनांत न धरतां केवळ माझीच निरंतर अखंड भक्ति जे करतात, त्यांना ती भक्तीच सालोक्य, सायुज्य, सरूप आणि समीप अशी चार प्रकारची

मुक्ति देत असते. पण माझे कट्टे भक्त त्या मुक्तींचाहि स्वीकार करीत नाहींत. कारण मुक्त होण्यापेक्षां माझी सेवा करीत राहण्यांतच त्यांना खरा आनंद होत असतो. आई, सर्व भक्तींमध्यें ही निर्गुण भक्तीच सर्वश्रेष्ठ होय.

'हा भक्तियोगाचा विचार झाला. आतां कर्मयोगाचा विचार सांगतों.

'ज्या कर्मांमध्यें हिंसा सांगितलेली नाहीं, अशा प्रकारचीं शास्त्रानें सांगितलेलीं कर्में करणें, माझ्या विभूतींचें दर्शन घेणें, माझी स्तुति करणें, माझी पूजा करणें, माझें स्मरण करणें, मला नमस्कार करणें, सर्व प्राणिमात्रांमध्यें मींच भरलेला आहें अशी भावना ठेवून समबुद्धीनें सर्व प्रकारच्या विषयांचा त्याग करणें, असत्य भाषण वर्ज्य करणें, थोरांना बहुमान देणें, दुःखितांवर दया करणें, बरोबरच्याशीं मैत्रीनें वागणें, यम–नियमांचें पालन करणें, वेदान्तशास्त्राचें श्रवण करणें, माझें नामसंकीर्तन करणें, साधूंची संगति धरणें, सर्वांशीं सरळ, निरहंकार वर्तन करणें, अशा प्रकारचा जो धर्म आहे त्याचें आचरण केल्यामुळें साधकाचें मन शुद्ध होतें. माझ्या गुणांचें श्रवण केल्यानेंच लोकांना माझी प्राप्ति होते. ज्याप्रमाणें वायूशीं संगत असलेला सुगंध वायूबरोबर नाकांत शिरत असतो, त्याप्रमाणें योगाभ्यास करणाराचें मन आपोआप आत्म्यामध्यें प्रवेश करीत असतें. सर्व प्राणिमात्रांत मीच आत्मरूपानें भरून राहिलों आहें, हें न जाणतां मी या जगाच्या बाहेर दूर कोठें तरी आहे अशी कल्पना करून अज्ञानी लोक माझी पूजाअर्चा करीत असतात. पण त्यांच्या त्या कर्मांनीं आणि पूजेच्या अनेक पदार्थांनीं माझा संतोष होत नाहीं. सर्व भूतांचा अवमान करून जे कोणी एखाद्या मूर्तीमध्येंच मी आहें असें मानून माझें पूजन करतात, ते माझी भक्ति करतात असें मला मुळींच वाटत नाहीं. जोंपर्यंत मी सर्वत्र भरलेला आहें अशी अज्ञजनांची भावना होत नाहीं, तोंपर्यंत त्यांनीं प्रतिमेच्या ठिकाणींच मी आहें अशी समजूत ठेवणें शोभतें. जीवात्मा आणि परमात्मा हे भिन्न आहेत अशी भावना जोंपर्यंत कायम असते, तोंपर्यंत मनांत दुजेपणा वसत असल्यामुळें जन्ममरणादि संसाराचें भय कायम असतें. यासाठीं जे सर्वत्र मित्रभावानें वागतात, तेच माझी खरी पूजा करतात असें मी समजतों.

'सर्व भूतांचे ठायीं मीच वास्तव्य करतों अशी निष्ठा ठेवून, चैतन्यस्वरूप असा मी सर्व प्राण्यांचे ठिकाणीं जीवरूपानें राहातों असें जाणून सर्वांना नमस्कार करावा. मी सर्व भूतांमध्यें असल्यामुळें जीवात्मा वेगळा आणि परमात्मा वेगळा अशी भेदबुद्धि कधींहि धरूं नये.

'असे हे योग मीं तुला सांगितले. त्यांपैकीं कोणत्याहि मार्गानें गेलें असतां शमदमादि साधनसंपत्ति प्राप्त होते. यासाठीं, आई, भक्तियोग साध्य करून घेऊन मी सर्व भूतांमध्यें वास करीत आहें हें जाणून घे. किंवा मी तुझा पुत्र आहे असें मानून तूं जरी माझें सतत स्मरण केलेंस तरी तुझ्या मनाला नित्यशांति प्राप्त होईल.'

—**अध्यात्मरामायण**

(उत्तर काण्ड–सर्ग सातवा)

# रामनामच कां आणि कसें घ्यावें

**महात्मा गांधी**

विश्वकर्त्याचीं इतर असंख्य नांवें असतांना त्यांपैकीं कोणतेंहि नांव न सांगतां, मी रामनामच तेवढें घ्यायला कां सांगतों, असा प्रश्न तुम्ही मला विचाराल. ईश्वराची अनेक नांवें आहेत हें खरें. झाडावर जेवढीं पानें असतात त्याहिपेक्षां देवाचीं नांवें अधिक आहेत. तेव्हां त्यांपैकीं एखादें नांव घेण्यास मीं तुम्हांला सांगावें असें तुम्हांला वाटेल. समजा ' गॉड ' हें नांव घ्यायला मीं तुम्हांला सांगितलें. गॉड म्हणजे ईश्वर. पण गॉड या शब्दानें तुमच्या मनांत कोणता अर्थ उभा राहील ? हा शब्द उच्चारतांच त्या शब्दाला चिकटलेल्या कोणत्या कल्पना तुमच्या मनांत वावरूं लागतील ? ईश्वराचें नामस्मरण करूं लागल्याबरोबर आपलें अंतःकरण भावनेनें उचंबळून आलें पाहिजे. पण गॉड या शब्दानें तुमच्या अंतःकरणांत ' भाव ' निर्माण होण्यासाठीं मला तुम्हांला प्रथम थोडें इंग्रजी शिकवावें लागेल. परकीय लोकांच्या मनांत गॉड या शब्दाच्या उच्चारासरशीं कोणकोणते विचार उत्पन्न होतात, कोणत्या कल्पना प्रादुर्भूत होतात हें मला प्रथम नीट समजावून द्यावें लागेल.

पण रामनामाची अशी स्थिति नाहीं. या भूमींतील कोट्यवधि लोकांनीं पिढ्यानुपिढ्या या रामनामाची पूजा केली आहे. हजारों वर्षें हिंदुस्थानांतील लोक याचा जप करीत आले आहेत. हिंदुस्थानांतील पशुपक्ष्यांना रामनामाची ओळख झाली आहे, इथल्या लतावृक्षांना या नामाची पक्की माहिती आहे. या भूमींतील दगडधोंड्यांना देखील रामनामाचा पूर्ण परिचय झाला आहे. राम वाटेनें चालला असतां रस्त्याच्या कडेच्या एका शिळेला त्याचा चरणस्पर्श झाला; व त्या स्पर्शानें ती शिळा सजीव झाली, तिला मानवदेह प्राप्त झाला ही गोष्ट रामायणांत तुम्हीं वाचली असेल. हें रामनाम अत्यंत भक्तिभावानें घेतलें पाहिजे. सर्व माधुर्य एकवटून रामनामाचा उच्चार केला पाहिजे. आपल्या नामसंकीर्तनांत इतका जिव्हाळा व गोडवा ओतप्रोत भरलेला असला पाहिजे कीं पक्षी सुद्धां आपली किलबिल थांबवून लक्षपूर्वक तुमचें रामनाम ऐकूं लागले पाहिजेत. तुमच्या नामोच्चाराच्या माधुर्यानें वृक्षसुद्धां इतके वेडावून जावेत कीं त्यांनीं तुमच्या दिशेनें आपला पर्णसंभार वांकविला पाहिजे. '

× × ×

रामनामाच्या महिम्याविषयीं गोस्वामी तुलसीदासांनीं इतकें वर्णन केलेलें आहे कीं, त्याबद्दल अधिक सांगण्यासारखें कांहीं उरलेलें नाहीं. द्वादशाक्षरी, अष्टाक्षरी असे सर्व पवित्र मंत्र, संसाराच्या मायेच्या जाळ्यांत गुरफटून गेलेल्या जीवांना

शांति-समाधानाची प्राप्ति करून देतात याविषयीं तिळमात्र संशय नाहीं. आपल्या चित्ताला ज्यानें समाधान लाभतें अशा मंत्राचा प्रत्येकानें मनःपूर्वक अवलंब करावा. पण ज्यांच्या अंतःकरणांत अशांततेचा डोंब उसळलेला आहे, मनःशांति लाभावी म्हणून जे त्रिखंड धुंडीत आहेत, त्यांनीं रामनामाचा जप करावा, म्हणजे काय चमत्कार होतो हें त्यांना अनुभवास येईल. देवाचीं हजार नांवें आहेत. खरोखरी त्याच्या नामांना मितिच नाहीं. त्याचीं नांवें जशीं असंख्य तसा त्याचा यशोमहिमाहि अमर्याद. आपल्या जीवांत जीव आहे तोंवर ईश्वरनाम हाच आपला एकमेव आधार आहे. या चालू युगांत अज्ञानी व निरक्षर माणसालाहि ज्याचा आसरा घेतां येईल असा मंत्र एकच—आणि तो म्हणजे 'राम' हाच काय तो. 'राम' हा शब्द उच्चारतांच एक अखंड ध्वनि निर्माण होतो. खरोखर पाहतां 'ॐ' हें पुण्याक्षर आणि 'राम' हा शब्द यांमध्यें वस्तुतः काडीमात्र फरक नाहीं. या पवित्र नामाचा महिमा केवढा मोठा आहे हें युक्तिवादाच्या डावपेंचांनीं आणि बुद्धीच्या करामतींनीं सिद्ध करणें अशक्य आहे. हा महिमा केवळ अनुभवानेंच काय तो जाणतां येण्यासारखा आहे. दृढभक्ति आणि श्रद्धा यांच्या साहाय्यानेंच केवळ हा अनुभव घेतां येण्यासारखा आहे.

* * *

# चिमुकल्या खारीची रामसेवा

समुद्रपार होऊन लंकेस जातां यावें यासाठीं रामानें वानरांच्या साहाय्यानें सेतु बांधण्यास सुरुवात केली होती. रामाच्या पक्षाचे कित्येक राक्षस आणि वानर यांनीं मोठमोठ्या टेंकड्या खणून काढून समुद्रांत घातल्या व प्रचंड वृक्ष आणि धोंडे यांचे ढीग त्यांवर रचले. हें पुलाचें काम चालू असतां एक लहान खार वाळूत प्रथम लोळून मग पुलाच्या जागीं जाऊन आपलें आंग झाडीत असे. अशा रीतीनें पुलाला भरणी घालण्याचें काम ती करीत होती. हें तिचें कृत्य पाहून वानरांस हंसूं कोसळलें. मोठमोठे डोंगर आणि अरण्याचीं अरण्यें जेथें गडप होत होतीं, त्या ठिकाणीं एक खार आपलें अंग झाडून त्यांतून पडणाऱ्या वाळूनें भर घालीत होती! हा देखावा पाहून वानर सारखे हंसत सुटले. रामानें खारीचे ते परिश्रम पाहिले व म्हटलें, 'या लहानग्या खारीची धन्य आहे. आपल्या-च्यानें होईल तितकें काम ती मन लावून करीत आहे. यासाठीं मोठमोठ्या बलाढ्य वानरांइतकेंच तिचें थोरपण आहे यांत मुळींच संशय नाहीं.' असें म्हणून त्यानें तिच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरविला. त्याच्या खुणा अद्यापिहि खारीच्या पाठीवर पट्ट्यांच्या रूपानें राहिल्या आहेत!

* * *

# भारतापुढील आदर्श—सीता

राम आणि सीता यांचीं चरित्रें आर्यावर्तांत आदर्शवत् मानलीं जातात. तेथील सर्व स्त्रिया सीतेची पूजा करीत असतात. एखाद्या स्त्रीची अत्यंत उत्कट इच्छा पाहिली तर ती सीता होण्याची असते. अत्यंत पवित्र आणि अत्यंत प्रेममय असतांहि जिनें जन्मभर कष्ट सोसले त्या सीतेसारखें व्हावें, ही आमच्या आर्य स्त्रियांची अत्यंत मोठी इच्छा असते. राम आणि सीता यांच्या चरित्रांचें सूक्ष्म अवलोकन केलें असतां पौर्वात्य आणि पाश्चात्य देशांतील लोकांच्या आदर्शकल्पनांत भेद कोणता आहे तो लक्ष्यांत येतो. शरीराला कष्ट कितीहि पडोत, दुःखें कितीहि प्राप्त होवोत आणि कसलींहि संकटें कोसळोत, पण आपल्या दानतींत यत्किंचित्‌हि फरक होऊं द्यायचा नाहीं, हा सीतेच्या वर्तनाचा आदर्श आर्यांनीं आपल्यापुढें ठेवला आहे. पाश्चात्य राष्ट्रांचा आदर्श कर्मप्रवणता हा आहे. एकसारखें कर्म करून आपला मोठेपणा स्थापन करा, असा पाश्चिमात्य संस्कृतीचा उपदेश आहे. पौर्वात्य संस्कृति याच्या उलट उपदेश करीत आहे. आपलें मोठेपण कष्ट सोसण्यांत आहे असें आर्य संस्कृतीचें मत आहे. मनुष्याला किती भोग भोगणें शक्य आहे, हा प्रश्न पाश्चिमात्य राष्ट्रें सोडवीत आहेत. उलटपक्षीं मनुष्याला आपल्या गरजा किती कमी करतां येतील, हा प्रश्न आर्यभूमीनें सोडविला आहे. या दोन स्थिति परस्परांशीं अत्यंत विसदृश आहेत हें आपल्या लक्ष्यांत आलें असेलच. सीता हा हिंदुलोकांचा आदर्श आहे. आर्यभूमीच्या सर्व आकांक्षा एकत्र करून त्यांची मूर्ति निर्माण केली तर ती सीतेसारखी होईल. वस्तुतः सीता निर्माण झाली होती कीं नाहीं, राम खरोखर अस्तित्वांत होता कीं नाहीं अथवा त्याचें चरित्र ही केवळ कवीची कल्पनारम्य रचना आहे, इत्यादि प्रश्नांशीं आपणांला कांहीं कर्तव्य नाहीं. आर्यांचा आदर्श कोणत्या प्रकारचा होता आणि आपल्या संस्कृतीचा नमुना कोणत्या प्रकारचा असावा याचें उत्तम चित्र येथें आपणाला पहावयास मिळतें. एकंदर पुराणांपैकीं रामचरिताइतकें लोकमान्य झालेलें दुसरें एकहि पुराण नाहीं. जनतेच्या अगदीं वरच्या थरापासून तों थेट तळापर्यंत या पुराणांतील रहस्य लोकांच्या हाडींमासीं खेळत आहे. सीता हें नांव सर्वतोमुखीं झालेलें आहे. सीता म्हणजे केवळ सौजन्य, शुद्धता आणि पातिव्रत्य यांची जिवंत मूर्तीच. स्त्रीला शोभा देणारे जे जे गुण असावे असें आपणांस वाटतें ते सर्व सीतेच्या ठायीं होते. एखाद्या स्त्रीला आशीर्वाद द्यायचा असला तर 'सीतेसारखी हो' असें म्हणतात. सांप्रतचें आर्यावर्त हें सीतेच्या मुलांसारखें आहे. सीतेसारखें होण्याचा यत्न आज कित्येक युगें तें करीत आहे.

— **स्वामी विवेकानंद**

# श्रीज्ञानेश्वरांच्या चमत्कारांना बोपदेवांची साक्ष

लेखक : वाङ्मयप्रभु खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर

संत–चरित्रें कोणी लिहावीं आणि कशीं लिहावीं हा एक मोठा चिंतनीय प्रश्न आहे. ही गोष्ट ज्ञानेश्वर महाराजांचीं चरित्रें ज्यांनीं आधुनिकतेच्या दृष्टीनें लिहिलीं आहेत तीं वाचलीं कीं प्रामुख्यानें दृष्टीसमोर उभी रहाते. आधुनिकतेची दृष्टि ही परंपरा सुटलेली दृष्टि. अतींद्रिय शास्त्र काय चीज आहे हें पहाण्याचा 'देखणेपणा' ह्या दृष्टींत नाहीं. किंबहुना ह्या शास्त्राच्या पूर्ण अज्ञानामुळें ह्या आधुनिकतेच्या दृष्टीच्या लेखकांची ह्या अतींद्रिय शास्त्रावर मुळींच श्रद्धा आणि विश्वास नाहीं. ह्यामुळें संत–चरित्रांतील चमत्कारांनीं भरलेल्या कथांचा ज्यावेळीं निर्देश करून त्यांवर लिहिण्याचा ह्या आधुनिकांवर प्रसंग येतो त्यावेळीं हें सर्व झूट आहे, ह्या सर्व लफंग्या व बुवाबाजीमागें लागलेल्या माणसांनीं भोळसट भाविक लोकांना फसविण्यासाठीं केलेल्या क्लृप्त्या आहेत असें आधुनिकांकडून ठाम सांगितलें जातें. अशा वेळीं निदान इतिहाससंशोधनाच्या शास्त्रीय दृष्टीनें तरी आपण आपली चरित्र–लेखनाची जबाबदारी कितपत पाळत आहोंत ह्याचेंसुद्धां त्यांना भान रहात नाहीं. कांहीं प्राध्यापक लोकांनीं लिहिलेलीं ज्ञानेश्वरांचीं चरित्रें वाचिलीं कीं संत–चरित्रें कोणीं व कशीं लिहावीं हा प्रश्न पुढें दत्त म्हणून उभा राहतोच. म्हणून हा विषय जाहीरपणें जनतेपुढें चर्चिला जावा ह्याच उद्देशानें हा लेख लिहिला आहे. उदाहरणार्थ आपण प्रा. आळतेकरांचे 'श्री ज्ञानदेव' ह्या पुस्तकांतील एक दोन प्रसगांचा विचार करूं.

श्री ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या मुखांतून वेद वदविले ह्या चमत्कारावर प्रा. आळतेकरांचा विश्वास नाहीं. त्याचप्रमाणें श्री ज्ञानेश्वरांनीं एका ब्राह्मणाच्या घरीं श्राद्धाला पितर जेवावयास बोलाविले ह्या गोष्टीवरही त्यांचा विश्वास नाहीं. ह्यासंबंधीं प्रा. आळतेकर म्हणतात, 'पैठणला त्यांनीं (ज्ञानेश्वरांनीं) केलेले चमत्कार हे त्यांचा थोरपणा स्थापित झाल्यानंतर त्यांच्यावर पुढील पिढींतील बावळट भाविकांनीं किंवा स्वतःला चमत्कार करणारे साधू म्हणून मिरविणाऱ्या लफंग्यांनीं लादलेले दिसतात.' ही प्रा. आळतेकरांची आधुनिकतेची भाषा ठीक आहे. आणि त्याचप्रमाणें श्री ज्ञानेश्वरांनीं श्राद्धाला पितर बोलाविले ह्या गोष्टी खऱ्या मानणाऱ्या बावळट भाविक लोकांची घेतलेली हजेरी सडेतोड आहे हें मान्य आहे. पण हें सारें कबूल करूनहि इतिहास-संशोधनाच्या दृष्टीनें हें पूर्ण प्रमादास्पद आहे हें स्पष्ट सांगितलें पाहिजे. ज्ञानेश्वरकालीन प्रसंगांबद्दल आपण जवळजवळ अंधारांत आहों असें म्हणावें लागतें. ही गोष्ट श्री-ज्ञानेश्वरांचीं दोन चार भिन्न भिन्न चरित्रें वाचल्याबरोबर तत्काळ लक्षांत येतें. उदाहरणार्थ, श्रीज्ञानेश्वरांनीं रेड्याच्या मुखांतून वेद आधीं म्हणविले व मग शुद्धिपत्र मिळविलें

कीं शुद्धिपत्र मिळविल्यावर हा रेड्याचा चमत्कार करून दाखविला ह्या प्रसंगाच्या कालानुक्रमाबद्दल चरित्रकारांत एकवाक्यता नाहीं. पुन्हां त्यांनीं शुद्धिपत्र मिळविले तें तरी नक्की कोणतें ह्याचा सुद्धां कांहीं लेखकांना थांगपत्ता नाहीं. अशा घोंटाळयाच्या परिस्थितींत चरित्र–लेखकाचें आवश्यक आणि आद्य कर्तव्य म्हणजे चरित्रविषयाच्या समकालीन व्यक्तीचे जर कांहीं पुरावे सांपडले तर त्यांचा विचार करणें हें होय. इतिहास–संशोधन शास्त्राचा हा एक सामान्य नियमच आहे. आणि श्रीज्ञानेश्वरांचीं आधुनिकांनीं लिहिलेलीं चरित्रें ह्या नियमाला अपवाद नाहींत. रेड्याच्या मुखांतून वेद म्हणविले ह्या गोष्टीचा ज्ञानेश्वरांच्या समकालीन संतकवींनीं आपल्या काव्यांत निर्देश केलेला आहे. ह्या एकच गोष्टीवरून हे चमत्कार ‘ पुढील पिढींतील बावळट भाविकांनीं किंवा स्वतःला चमत्कार करणारे साधू म्हणून मिरविणाऱ्या लफंग्यांनीं लादलेले दिसतात ’ हा प्रा. आळतेकरांचा आक्षेप खोटा ठरतो. ह्यावर आधुनिकतेच्या दृष्टीनें अशी सुद्धां शंका घेतली जाईल कीं, ज्ञानेश्वरांचे समकालीन संतकवि जरी संत असले तरी भोळसट व अंधश्रद्ध लोक, त्यांच्या उद्गारांना कसली किंमत ? अशी शंका काढणाऱ्या आक्षेपकाचें सुद्धां समाधान करणें जरूर आहे. आणि तें सुद्धां करण्यास ऐतिहासिक पुरावा सांपडतो. पूर्वीं झालेल्या सुप्रसिद्ध भारदे–भिंगारकर वादांत श्री. भिंगारकरांनीं बोपदेवाचें शुद्धिपत्र प्रसिद्ध केलें आहे. हें शुद्धिपत्र प्रा. आळतेकरांपुढें चरित्रलेखनाच्या वेळीं नव्हतें हें उघड आहे. तें जर त्यांच्यापुढें असतें तर त्याचा त्यांनीं प्रामाणिकपणें विस्तारपूर्वक ऊहापोह केला असता ह्याबद्दल कुणालाहि संशय नाहीं. बोपदेव हे कांहीं संत नव्हेत. देवगिरीचे राजे रामदेवराव यांच्या कारकिर्दींतील हेमाद्रि व बोपदेव ह्या सुप्रसिद्ध ऐतिहासिक व्यक्ति आहेत. बोपदेव व इतर ब्रम्हवृंदासमोर श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं रेड्याच्या तोंडून वेद वदविले हा कथाभाग बोपदेवांनीं स्वतः लिहिलेल्या श्री ज्ञानेश्वरांना दिलेल्या शुद्धिपत्रांत आहे, ह्या शुद्धिपत्रांत हीं सर्व भावंडें सर्वतोपरी शुद्ध आहेत असाच निर्णय त्यांत दिलेला आहे. ह्यांतील कांहीं उद्बोधक भाग वाचकांनी जरूर विचार करण्यासारखा आहे तो असा—

‘ लुलायमेतं स्वकुलायसिद्धये विधेह्यशेषश्रुतिवेदपाठकम्
इतीरितस्तस्य निधाय मूर्धनि करं स वेदाकरमेनमातनोत् ॥ २० ॥ ’

सारांश—‘ आपल्या स्थानसिद्धीसाठीं ह्या रेड्याकडून सर्व वेद म्हणव ’ हें म्हटल्यानंतर (श्री ज्ञानेश्वरांनीं) त्याच्या (रेड्याच्या) डोकीवर हात ठेवून वेद म्हणवून घेतले.

‘ समक्षं सर्वेषां भुवमभवदेषां द्विजनुषां ह्यशेषाणां गोदातटभुवि तु मोदाय विदुषां ।
चरित्रं चित्रं तन्महिष इह संतर्जितबुधोऽखिलानुच्चैर्वेदानुचितपदभेदान् समपठत् ॥२१॥ ’

सारांश—ह्या सर्व ब्राम्हणांच्या समोर गोदावरीच्या तटभूमीवर हें विस्मयजन्य चरित्र खचित सर्वांना आनंददायी झालें. तो रेडा सर्व विद्वानांना लज्जित करून योग्य पदभेदासहित मोठ्यानें वेद म्हणता झाला.

एवंविधानि विविधानि विलोकितानि ज्ञानेश्वरस्य चरितानि महाद्भुतानि।
विप्रास्ततोऽत्र मिलिताः सकला विशुद्धेः पत्रं पवित्रहृदयेन समर्पयामः॥ २२॥

सारांश :—अशा प्रकारचीं ज्ञानेश्वराचीं अत्यंत अद्भुत चरित्रें पाहून आम्हीं येथें जमा झालेले सर्व ब्राह्मण हें विशुद्धिपत्र पवित्र हृदयानें समर्पण करितों.

'ज्ञानेश्वरस्मरणतः स्मरणेन मुक्तान् मुक्ताग्रजोऽयमखिलान् खलु कर्तुमीष्टे।'
निंद्यो न बोधरहितैः स्वहितैकसिध्दयै वंद्यो ध्रुवं सुकृतिभिः कृतिभिः समस्तैः॥ २३॥

सारांश :—हा मुक्ताबाईचा वडील बंधु ज्ञानेश्वर आपल्या स्मरणानें सर्वांना मुक्त करण्यास समर्थ आहे. आपल्या स्वतःच्या केवळ हिताच्या साधनार्थ अज्ञानी लोकांनीं ह्याची निंदा करूं नये. सर्व कृतकृत्य पुण्यशाली लोकांना हा खचित् वंद्य आहे.

शुद्धिपत्राच्या शेवटीं बोपदेवांनीं तें समर्पण करण्याचा काल दिलेला आहे. ('शालिवाहन शके १२०९ माघ शुद्ध पंचमी सर्वजित्‌नाम संवत्सर ह्या सालीं सर्व ब्राह्मणांनीं व बोपदेवांनीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांस हें शुद्धिपत्र समर्पण केलें.')

वरील उताऱ्यांवरून पहिली गोष्ट अशी ठळकपणें दिसून येते कीं, श्री ज्ञानेश्वरांनीं रेड्याच्या तोंडांतून वेद वदविले ह्या चमत्काराला त्यांच्या समकालीन अशा थोर बोपदेवाचीच साक्ष आहे. तेव्हां चारित्रलेखक जरी कितीहि आधुनिक असला तरी संशोधनाच्या दृष्टीनें शुद्धिपत्रांतील ऐतिहासिक सत्याची मर्यादा त्याला ओलांडितां येणें शक्य नाहीं. हा निर्बंध आधुनिकतेच्या दृष्टीनें संतांचीं चरित्रें लिहिणारांनीं अवश्य पाळलीं पाहिजे. आणि असले निर्बंध पाळणें हें त्यांच्या 'चक्षुर्वै सत्यं' बुद्धीला पटत नसेल तर त्यांनीं संतांचीं चरित्रें लिहिण्याच्या भानगडींत न पडणें हेंच श्रेयस्कर आहे.

वर उद्धृत केलेल्या बोपदेवाच्या शुद्धिपत्रांतील भागावरून ज्ञानेश्वरादि चार भावंडें सर्वतोपरी शुद्ध आहेत असा हजर असलेल्या सर्व समंजस ब्रह्मवृंदांनीं निर्णय दिला होता. त्यावरून त्यांना ब्राह्मणज्ञातींत घ्यावें असाच निष्कर्ष निघतो. परंतु बहुसंख्य अशा कर्मठ ब्राह्मणांच्या आततायीपणामुळें वरील निर्णय मान्य केला गेला नाहीं. इतकेंच नव्हे तर बोपदेवांनीं दिलेलें हे खरें शुद्धिपत्र दडपून टाकून दुराग्रही आणि धूर्त कर्मठांनीं—

नाहीं प्रायश्चित्त उभय कुलभ्रष्ट। बोलियेले श्रेष्ठ पूर्वापार॥
या एक उपाय असे शास्त्रमतें। अनन्य भक्तीनें अनुसरावें॥
तीव्र अनुतापें करावें भजन। गो खर आणि श्वान वंदुनियां॥

अशा तऱ्हेचे अभंग नामदेवांच्या आधींच्या अभंगांत घुसडून देऊन हेंच केवळ शुद्धिपत्र आहे असें लोकांना भासविण्याचा प्रयत्न केला असावा असा बळकट संशय येतो. ह्या बाबतींत हा ब्राह्मणांचा म्हणून दिलेला निर्णय केवळ काल्पनिक दिसतो, हा प्रा. आळतेकरांचा अभिप्राय योग्य दिसतो.

आतां श्राद्धाला एका ब्राह्मणाच्या घरीं ज्ञानेश्वर गेले व त्यांना श्राद्धाचें आमंत्रण कोणीं दिलें इ. वादग्रस्त प्रश्न. श्रीनिवृत्तिनाथ व ज्ञानेश्वर ह्यांची मुंज झालेली नसल्यामुळें ते ब्राह्मण नव्हते व त्यांना कोणता ब्राह्मण श्राद्धाला बोलावणार इत्यादि कारणें देऊन श्री ज्ञानेश्वरांनीं त्या ब्राह्मणाचे पितर बोलाविले ह्या चमत्काराची कल्पना म्हणजे तेराव्या शतकांतील भाविक वेड्यांचें खूळ असें प्रा. आळतेकरांनीं ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु ऐतिहासिक दृष्टया हाहि त्यांचा समज चुकीचा आहे असें दिसतें. वर केलेल्या बोपदेवांच्या शुद्धिपत्रांत ह्या श्राद्धाच्या प्रसंगाची हकीगत निराळीच आहे. त्या हकीगतीप्रमाणें प्रा. आळतेकरांनीं जे प्रश्न उपस्थित केले आहेत ते पुढें येऊं शकत नाहींत. मूळ हकीगत अशी आहे कीं, श्री ज्ञानेश्वरांचे वडील श्री विठ्ठलपंत हे आपल्या चार मुलांस घेऊन आळंदीस आपल्या 'कृष्ण' नांवाच्या मामाकडे गेले. त्या मामाकडे श्राद्धपक्ष निघाला. पण विठ्ठलपंत व चार भावंडें त्याच्याकडे असल्यामुळें गांवांतील ब्राह्मणांनीं त्यांच्यावर बहिष्कार घातला होता. ह्या प्रसंगीं श्री ज्ञानेश्वरांनीं आपल्या वडीलांच्या मामाच्या पूर्वजांना बोलावण्याचा चमत्कार केला ही गोष्ट बोपदेवांच्या शुद्धिपत्रांत आहे. म्हणून ह्या वादांत ज्ञानेश्वर एका ब्राह्मणाच्या घरीं कां गेले व त्यांना कोणी बोलाविलें हे प्रश्न ते कसे गेले ह्या गोष्टीचें केवळ अज्ञान असल्यामुळें उत्पन्न होऊं शकतात.

वरील चर्चेवरून संतचरित्रें आधुनिकतेच्या दृष्टीनें लिहिणें किती चिंतनीय आहे हे जनतेच्या नजरेस येईल. म्हणून अशीं आधुनिकांनीं आधुनिकतेच्या दृष्टीनें आधुनिकांसाठीं लिहिलेलीं संतचरित्रें किंवा प्राध्यापकांनीं केवळ विद्यार्थ्यांच्यासाठीं आधुनिक दृष्टीनें लिहिलेलीं संतचरित्रें वाचतांना सामान्य वाचकांनीं तीं अत्यंत सावधपणें वाचावीं हें अवश्य ठरतें.

# श्रीसाईबाबांच्या चरणीं प्रार्थना

साईबाबा सदया, संकटिं मी घोर आज सांपडलों
तारा यांतुन सत्वर नाहिंतरी पार पार मी बुडलों ॥ १ ॥
कनवाळु संत मोठे, भावें जातील त्यांस जे शरण
रक्षुनि त्यांस निजांगें संकटिं चुकवीति जन्म नी मरण ॥ २ ॥
बहु–थोर भाग्य म्हणुनी दर्शन घडलें भला विनायास
'दाते' समर्थ असतां, वाण कशाची पडेल 'विश्वास' ॥३॥
प्रत्यक्ष सांगती श्री–हरि कीं मजहून थोर संत–जन
मातें पावायास्तव त्यांचेंच करा तुम्ही सदा भजन ॥ ४ ॥
केलें बहु वाचन नी श्रवण परंतू कळेचिना मातें
कैसें भजन करावें, ध्यावें कैसें त्वदीय नामातें? ॥ ५ ॥
तें सांगा हो बाबा, स्वप्नीं येऊन माझिया कानीं
तोंवर भरूनि अंबर टाकिन माझ्या अखंड हाकांनीं ॥ ६ ॥
नामोच्चारण–मात्रें वाहो प्रेमें भरूनि हें हृदय
इतुकेंचि द्या, न होती साधु कदा आश्रितावरी अदय ॥ ७ ॥
बाबा, कितीक भक्तां लवलाही पावलांत आपण हो ।
पावा तैसे मातें, येऊं द्या शीघ्र आर्तकरुणा हो ॥ ८ ॥
संकट उपकारक हें, श्रद्धा दृढ जडलि आपुले ठायीं
तें गेलें तरि न ढळो श्रद्धा ही प्रार्थना असे पायीं ॥ ९ ॥
गेलें एक तरी तें दुसरें हो निश्चयें पुढें येतें
सत्संगती मिळाली मनुजातें तरि सुसह्य होतें तें ॥ १० ॥
राहो अथवा जावो संकट, द्या साधु–संगती मातें
याविण दुजें न मागें, पुरवा या एक मात्र कामातें ॥ ११ ॥

—केशवतनय

मुंबईस थाटामाटानें साजरें झालेलें

# अ. भा. साईभक्त संमेलन

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणें श्री साईभक्तसंमेलन ता. २३ ते २६ जानेवारी अखेर-पर्यंत यशस्वी रीतीनें पार पडलें. या संमेलनाचे उद्घाटक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अध्यक्ष श्री. दातार ( भारत–सरकारच्या गृहखात्याचे उपमंत्री ), तसेंच श्री रामकृष्ण मिशनचे स्वामी संबुद्धानंद, प्राचार्य ए. आर. वाडिया, मुंबई सरकारचे मुख्य मंत्री ना. मुरारजी देसाई, महसूलमंत्री ना. भाऊसाहेब हिरे, श्रीमती मणी साहुकार यांच्यासारख्या विद्वानांचीं व थोरामोठ्यांचीं मार्गदर्शक भाषणें संमेलनास फार मोठ्या जमावानें हजर राहिलेल्या स्त्रीपुरुषांस ऐकायला मिळालीं. त्याचप्रमाणें संत गाडगेमहाराज व संत तुकडोजीमहाराज यांच्या भजन–प्रवचनांची लज्जतही लुटायला मिळाली.

या संमेलनांत चारही दिवस अधूनमधून सुविख्यात गायक–गायिकांचें संगीत व सुरेल भजनांचे कार्यक्रम ठेवण्यांत आले होते. रोज रात्रौ ३।४ तास होणाऱ्या भजन–गायन कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठींही हजारोंच्या संख्येनें स्त्री–पुरुषांचा जमाव हजर असे. चारही दिवस संमेलनांत सुव्यवस्थितपणा व टापटीप समाधानकारक होती.

या संमेलनास जोडून भरविण्यांत आलेल्या प्रदर्शनांत शिरडी येथील श्री साई-बाबांच्या द्वारकामाईची प्रतिकृति अत्यंत यशस्वी रीतीनें निर्माण करण्यांत आली होती. व सकाळपासून दुपारीं बारापर्यंत भजन–पूजन, पारायण, आरती, नैवेद्य वगैरे सर्व कार्यक्रम शिरडीप्रमाणें व त्याच तोलाचे होत असत व त्यांत भक्तिभावानें भाग घेण्या-साठीं रोजच्या रोज साईभक्त–जनता मोठ्या प्रमाणांत हजर राहात असे.

या संमेलन–कार्यांत लहानमोठ्या सर्व कार्यकर्त्यांनीं आत्यंतिक आपुलकीनें व सेवाभावानें भाग घेतला. प्रत्येकजण आपापलें कार्य पार पाडण्यासाठीं मनापासून झटत गेला व त्यामुळेंच हें संमेलन घसघशीत व कल्पनेबाहेर यशस्वी झालें.

## डॉ. आंबेडकर यांचें भाषण

संमेलनाचे उद्घाटक डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या भाषणांत म्हणाले,

मी श्री साईबाबांचा अनुयायी किंवा भक्त नाहीं. मीं त्यांना पाहिलेलेंहि नाहीं. असें असतां आपण मला उद्घाटक या नात्यानें पाचारिलें याबद्दल मी आपला आभारी आहे. साईबाबांचा अनुयायीवर्ग फ़ार मोठा आहे असें मी ऐकतों व ते आज आपल्यांत नसले तरीहि त्यांचा भक्तवर्ग सतत वाढतच चाललेला आहे.

या देशांत धर्माला वेळोवेळीं वेगवेगळीं स्वरूपें प्राप्त होत गेलीं आहेत. त्यांपैकीं एक स्वरूप म्हणजे, जो आपल्या अडचणी व संकटें दूर करतो त्याला आमचे लोक देवाप्रमाणें मानून भजूं लागतात. तसेंच जो चमत्कार करून दाखवितो त्याच्याहि मागें बहुसंख्य जनता धांवूं लागते. मूर्तींची पूजा करणें, साधूसंतांची पूजा करणें किंवा त्यांच्या नादीं लागणें, व चमत्कार करणाऱ्यांच्या मागें लागणें, हींच सध्यां आमच्या धर्माचीं भिन्न भिन्न स्वरूपें आहेत. मानवी मनाची ही अत्यंत खालावलेली अवस्था आहे असें मी समजतों! तेव्हां धर्माला पूर्वीचें सोज्वळ व पवित्र स्वरूप प्राप्त करून देणें हें भावी पिढीचें एक महान् कर्तव्य होऊन राहील.

कसेंहि असो, सध्यां आपण आहे ती परिस्थिति लक्ष्यांत घेणें जरूर आहे. धर्माच्या बाबतींत आम्हीं चुकीच्या मार्गानें जात आहोंत एवढेंच नव्हे, तर धर्माच्या नांवानें पैसा जमा करून तो वाटेल त्या कामीं खर्च करणें हा सध्यां कित्येकांचा व्यवसाय होऊन राहिला आहे. देशांत दैन्य व दारिद्र्य इतकें बोकाळलें आहे कीं, धर्माच्या नांवानें पैसा जमा करून तो ब्राह्मणभोजनासाठीं किंवा यात्रेकरूंस पोसण्यासाठीं खर्च करणें हा गुन्हा आहे असें मी समजतों.

तेव्हां संतांच्या नांवें आपण पैसा जमविला असल्यास त्याचा विनियोग सत्पात्रीं व्हावा. आपल्या सभोंवार दैन्य, दारिद्र्य, अज्ञान, रोगराई किती तरी प्रमाणांत पसरलेली आहे. बहुसंख्य जनता त्यामुळें त्रस्त झालेली आहे. तरी पैशांचा सदुपयोग हें दुःख दूर करण्याकडे, अज्ञान घालविण्याकडे केला जावा. अशा रीतीनें अनेक क्षेत्रांत कार्य करणाऱ्यांचीं उदाहरणें आपल्यापुढें आहेत त्यांचें आपण अनुकरण करावें एवढेंच मला सांगावयाचें आहे.

## स्वागताध्यक्षांचें भाषण

श्री साईभक्त संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. बाजीराव तात्याजी कोते पाटील हे म्हणाले,

आजचा दिवस माझ्या आयुष्यांत महत् भाग्याचा व सोनियाचा उगवला आहे असें मला वाटूं लागलें आहे. माझ्यासारख्या श्री साईबाबांच्या एका खेडवळ भक्ताला आपणांसारख्या शहरवासी साईभक्तांचें स्वागत करण्याचा मान स्वागत–मंडळानें द्यावा ही कोणालाहि अभिमान वाटण्यासारखी घटना आहे. परंतु हा साईबाबांचा कृपाप्रसाद समजून मी आपलें सर्वांचें अंतःकरणापासून स्वागत करतों.

बाबांच्या कल्याणकारक संदेशाचें लोण आतां तरी यापुढील काळांत भारताच्या कोनाकोपऱ्यांतून व घरोघर पोहोंचविलें जाणें जरूर आहे, ती वेळ आतां येऊन ठेपलेली आहे असें वाटूनच कीं काय हें संमेलन मुंबईत भरविण्याची प्रेरणा येथील कार्यकर्त्यांना बाबांनीं दिली असावी असें माझ्या भोळ्या मनाला वाटूं लागतें व या संमेलनांतून भारताला व अखिल जगाला उपकारक व सर्व मानवजातीचें शाश्वत कल्याण साधणाऱ्या अशा घटना निर्माण होतील असा आशावाद माझ्या भाबड्या मनाला वाटूं लागला आहे.

नाना ठिकाणांहून नाना विचारांचीं थोर व विद्वान माणसें येथें श्री साईबाबांच्या प्रेमानें एकत्र जमलीं आहेत. त्यांच्यापुढें मी पामर एक खेडवळ काय सांगणार? हा लहान तोंडीं मोठा घास तर होत नाहीं ना, असें मला वाटूं लागलें आहे. कांहीं चुकलें-माकलें तर आपण संभाळून घ्या हीच विनंति आहे.

पण आपण करणारे व मार्ग दाखविणारे कोण? आम्हीं वृथा अभिमान कां बाळगावा? **तो जें करील तेंच होईल। मार्ग तयाचा तोच दावील । क्षण न लागतां वेळ येईल । मुराद पुरेल मनींची ॥** एवढेंच आत्मविश्वासपूर्वक सांगून व पुन्हां एकवार भरलेल्या अंतःकरणानें व प्रेमभावानें केलेलें हें स्वागत आपण गोड करून घ्यावें एवढीच शेवटीं माझी विनंती आहे.

## संमेलनाध्यक्ष श्री. दातार यांचें भाषण

अध्यक्ष श्री. बी. एन्. दातार आपल्या भाषणांत म्हणाले—

आपलें प्रेमाचें आमंत्रण, जरी मी ह्या मोठ्या मानाला पात्र नाहीं याची मला जाणीव आहे, तरीहि मला स्वीकारावें लागलें. आतांपर्यंतचा माझा अनपवाद असा अनुभव आहे कीं, श्रीसाईनाथ हे आपल्या भक्तांकरवीं त्यांचे बेत व कृत्यें सफल करून घेतात; व म्हणून माझी खात्री आहे कीं, ज्या आपणां भक्तांना त्यांचे भक्त होण्याचें व येथें येण्याचें भाग्य लाभलें त्यांच्याकडून संमेलनाचें हें वैचारिक अधिवेशन ते यशस्वी करून घेतील.

या मुंबईनगरींत अनेक धर्म, अनेक पंथ व अनेक जाती आहेत. सर्व धर्मांचें व पंथांचें मुंबई आजवर कोडकौतुक करीत आली आहे. बाबांनीं कोणताहि नवा धर्म किंवा नवा पंथ पुढें आणिला नाहीं. प्रत्येकानें आपापल्या नेमधर्माप्रमाणें किंवा पंथाप्रमाणें वागावें, राम-रहीम सर्वत्र आहेत, सर्वांशीं बंधुभावानें वागा, सर्वांकडे समदृष्टीनें पहा, त्यांतच सर्वांचें कल्याण आहे, सर्वांभूतीं ऐक्य पहाणें व सर्वांचा समन्वय साधणें हीच बाबांची मूलभूत शिकवण. माझ्या बंधूंनो, आज सर्वत्र मतामतांचा गलबला माजलेला आहे. प्रत्येकजण दुसऱ्यावर कुरघोडी करावयाला व दुसऱ्यास गिळंकृत करून आपण कृतार्थ होऊं पहात आहेत. हा विनाशाचा मार्ग आहे. साईभक्तांचा हा मार्ग नव्हे, हें कंठरवानें व टाहो फोडून सांगण्याची वेळ आज आलेली आहे. मुंबई ही सर्व बाबतींत व सर्व साधनांनीं परिपूर्ण आहे. येथें हांक दिली तर त्याचे पडसाद त्रिभुवनांत उमटूं शकतात. या दृष्टीनें पहातां मुंबईत भरणाऱ्या श्री साईभक्तसंमेलनाचें महत्त्व फार मोठें आहे असें कोणाहि विचारी माणसास पटल्याशिवाय राहाणार नाहीं.

माझी पूर्ण खात्री आहे कीं, ज्या मार्गाची व विजयाची सुरुवात प्रथम महाराष्ट्रांत व नंतर दक्षिणेंत झाली आहे त्याची भरारी थोड्याच अवधींत साता समुद्रांपलीकडे जाईल. ह्या एकाच अलौकिक चमत्काराबद्दल माझें मस्तक पहिल्याप्रथम सद्गुरुचरणीं आदरानें व नंतर ज्यांनीं ज्यांनीं त्यांच्या भक्तीची ध्वजा त्यांचे हयातींत व त्यांचे पश्चात् देशाच्या ह्या बाजूस यशानें फडकत ठेवली त्यांच्यापुढें व शेवटीं नृसिंहस्वामिजी व कित्येक दक्षिणेंतील साईभक्त यांच्यापुढें प्रेमानें नत होईल.

श्री साईबाबांचें सारें जीवन म्हणजे स्फूर्तिदायक व प्रकाश देणारा तो उघडा ग्रंथच आहे. ज्यांना आध्यात्मिक प्रकाश हवा असेल त्यांनीं खुशाल त्यांच्यापाशीं जावें व त्याचा लाभ करून घ्यावा. त्या भागांतून वाहणाऱ्या पवित्र गोदावरीच्या प्रवाहाप्रमाणें त्यांच्या कृपाप्रसादाचा प्रवाह सतत झुळुझुळु वाहात आहे.

श्री साईभक्तांना एकत्र व एका व्यासपीठावर आणण्यांतील हेतु, साईभक्तांचें आध्यात्मिक कल्याण साधावें एवढाच नसून जगाच्या सामाजिक व धार्मिक पुनरुज्जीवनाकडेहि व्यापक दृष्टीनें लक्ष पुरवावयाचें हा असल्याचें समजून मला समाधान वाटलें. आज शिरडी हें क्षेत्र सर्व धर्मांचा, मतामतांचा व वंशांचा समन्वय घडवून आणणारें आहे व त्या दृष्टीनें तें सर्वांना आदर्श होऊन राहावें; परंतु त्याचबरोबर विशाल जगाच्या पुनरुद्धारासाठीं आजच्या परिस्थितींत काय करतां येईल हेंहि साई-भक्तांनीं पाहिलें पाहिजे.

तांतडीनें निर्णय लावणें जरूर आहे असे कितीतरी प्रश्न विशेषतः स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर आपल्यापुढें खडे आहेत. आम्ही आमचें जीवनसाफल्य गरिबांतल्या गरिबाची व हलक्यांतल्या हलक्याची सेवा केल्यानेंच साध्य करूं शकणार आहोंत. कारण ती सेवा म्हणजेच देवसेवा होय असें गांधीजी म्हणत असत; त्यांतील रहस्य मला नेहमीं जाणवतें. दुःखी व पीडलेल्या अंतःकरणांत त्यांना देव दिसत असे व त्यांना ते 'दरिद्रीनारायण' म्हणत असत. गांधाजींनीं गोरगरिबांच्या सेवेला देवसेवेचा दर्जा उगाच नाहीं दिला! आध्यात्मिक सेवाभावाचा कार्यक्रम ठरवितांना समाजसेवेची ही बाजू या संमेलनाकडून लक्ष्यांत घेतली जाईल असें मला सुचवावेसें वाटतें.

मित्र हो, साईभक्तांनीं काय करावें किंवा कृतींत आणण्यासाठीं कोणता कार्यक्रम आंखावा, तसेंच या बाबतींत या संमेलनाच्या अपेक्षा काय असाव्यात यासंबंधानें मी बोलणें धाष्टर्याचें होईल. तरीहि साईभक्तांनीं स्वतःच्या आध्यात्मिक कल्याणासाठीं तसेंच समाजासाठीं काय करावें त्या बाबतींत दोन शब्द बोलण्याची मी परवानगी घेत आहें.

१. जीवनांतील आपलें कार्यक्षेत्र उच्च, हलकें, किंवा कोणतेंहि असो, आपलीं कर्तव्यें पार पाडतांना आपण पवित्र व नीतिधर्माला अनुसरून वागावें. तसेंच व्यापक जगाशीं संबंध जोडतांना आपला दृष्टिकोन व्यापक असावा. आम्ही आपलीं कर्तव्यें व आपल्या जबाबदाऱ्या पार पाडीत असतां ती एक प्रकारें ईश्वराची प्रार्थना आहे या भावनेनें आपण वागावें. तसेंच जेव्हां शक्य होईल तेव्हां शक्य तेवढा वेळ आपण एकांतवासांत व ध्यानधारणेंत खर्च करावा. आपल्या नित्याच्या दैनंदिन धार्मिक आचार-विचारांना आपण चिकटून रहावें. तसेंच जपजाप्य व भजनपूजन यांकडेहि लक्ष पुरवावें. ईश्वरप्राप्तीसाठीं प्रार्थनामय जीवन हा एक अचूक मार्ग आहे.

२. आपण जें जें कांहीं करतों तें तें निःसंकोचपणें सर्वस्वीं त्याला समर्पण करण्याच्या वृत्तीनें करावें; आणि जें कांहीं बरें वाईट वांट्याला येईल तें निरिच्छेनें व समाधान-

पूर्वक स्वीकारण्याची आपली तयारी असावी. अशा प्रकारची समर्पणाची व शरणागतीची वृत्ति आपण स्वीकारली म्हणजे आपल्या चिंता व दुःखें आपोआप नाहींशीं होतील. दुष्ट भावना किंवा आपल्याला न शोभणारे हेतू आपल्यापासून दूर जातील व आपण सतत त्याच्या मार्गदर्शनाखालीं आपलीं कर्मे योग्य मार्गानें आचरत राहूं; आणि मग असमाधानाला जागा राहाणार नाहीं.

३. हें सारें जग म्हणजे त्याची निर्मिती आहे या दृष्टीनें आपण जगाकडे पाहिलें पाहिजे. तसेंच सर्वांशीं नम्रतेनें व सेवाभावानें वागलें पाहिजे. हा सेवाभाव जर आपल्यांत निर्माण झाला तर समाजाचें कल्याण साधीत असतां आपण आपली नैतिक व आध्यात्मिक पातळी वाढविण्यास समर्थ होऊं. आम्ही आमच्या सर्व योजनांत, विचारांत व कृतींत स्वतःच्या हितसंबंधांना दुय्यम स्थान देऊन समाजाच्या हितसंबंधांस पहिलें स्थान द्यावें. हा विशाल समाज म्हणजेच भगवंताचें स्वरूप होय. आपल्या जीवनाचें योग्य प्रकारें नियोजन करून विशाल समाजाच्या कल्याणाकडे जास्तींत जास्त लक्ष्य देण्याचें धोरण स्वीकारलें म्हणजे भगवंतच आपल्या योगक्षेमाची काळजी वाहील. अशा प्रकारच्या धोरणामुळें आपल्या ठायीं ज्या सैतानी भावना आहेत त्या नाहींशा होण्याच्या मार्गाला लागतील व उच्च भावना कोणत्या व नीच भावना कोणत्या हें आपल्याला कळूं लागेल. आणि त्याचबरोबर आपल्या अंतरंगांत दडून राहिलेला दैवी भाव जागा होईल.

आपण कोणत्याहि व्यवसायांत असलों किंवा कोणत्याहि मार्गांत असलों तरी अशा प्रकारच्या समर्पित जीवनामुळें समाजाचा दर्जा वाढवीत असतां स्वतःचा दर्जा वाढविण्यास समर्थ होऊं. आणि मग आपल्याला आपल्या दुःखांचा व विकृत भावनांचा विसर पडेल. संपूर्ण निरिच्छतेचा दृष्टिकोन आपल्या ठायीं येईल व ऐहिक व पारमार्थिक आकांक्षा परिपूर्ण करण्याच्या मार्गावर असल्याचें शाश्वत समाधान आपल्याला लाभेल.

## प्रा. ए. आर. वाडिया यांचें भाषण

मंगळवार ता. २६ जानेवारी रोजीं (चौथ्या दिवशीं) सायंकाळीं प्राचार्य ए. आर. वाडिया यांच्या अध्यक्षतेखालीं श्रीसाईभक्तसंमेलनास सुरवात करून देतांना प्रा. वाडिया हे आपल्या भाषणांत म्हणाले, भारतानें आध्यात्मिक क्षेत्रांत फार मोठी कामगिरी बजाविली आहे. या जगांत विविध प्रकारचीं माणसें आपण पहातों. त्यांत दोन टोंकांस असलेलीं माणसें म्हणजे आधिभौतिक शास्त्राच्या दृष्टिकोनानें प्रत्येक गोष्टीकडे पहाणारीं माणसें व सनातनी, परंपरागत दृष्टीनें पहाणारीं माणसें. विश्वास, श्रद्धा, निष्ठा म्हणून ज्याला म्हणतात तो गुण अंगीं बाणल्याशिवाय धर्माचें स्वरूप आकलन करतां येणार नाहीं. धर्मासंबंधींच्या कल्पना व्यापक होत चालल्या आहेत. सनातनी वृत्तीच्या चाकोरींत धर्मकल्पनेला बसवून चालणार नाहीं. या जगांतील सर्व धर्म आपापल्या परीनें श्रेष्ठ आहेत. प्रत्येकानें आपापल्या धर्मांप्रमाणें वागून परमात्म्याची ओळख करून घ्यावी व ती करून घेतां येते असें मानणारा मी आहें. ज्यांचें पुण्यस्मरण आपण

येथें करीत आहोंत ते श्री साईबाबा याच तत्त्वाचे थोर पुरस्कर्ते होते. म्हणूनच मी या ठिकाणीं आलों आहें.

श्री साईबाबांचें एकंदर चरित्र व कार्य लक्ष्यांत घेतलें म्हणजे या देशांत होऊन गेलेल्या कबीर या थोर संताचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. कबीरानें हिंदु व मुसलमान हा भेदभाव कधीं बाळगला नाहीं. ते हिंदूंना हिंदु व मुसलमानांस मुसलमान भासले. श्री साईबाबांचेंहि तसेंच होतें. भेदाभेद त्यांना माहीत नव्हता. साईबाबा वयाच्या १६ व्या वर्षी शिरडींत आले व त्यांनीं आपलें जीवनकार्य सुरू केलें. कुराण असो वा गीता असो, कोणतेंही धर्मशास्त्र त्यांना पूज्य होतें. त्यांनीं कधीं कोणाला आपला धर्म सोडण्याचा आदेश दिला नाहीं. त्यांचें कार्यक्षेत्र फार व्यापक होतें. श्रीसाईबाबांची शिकवण हिंदु–मुसलमानांनीं आचरणांत आणली असती तर विभागणीमुळें जी आपत्ति या देशावर कोसळली ती कोसळली नसती.

## स्वामी संबुद्धानंदांचें भाषण

श्रीसाईभक्तसंमेलनांत श्रीरामकृष्ण मठ, खार, या संस्थेचे अध्यक्ष स्वामी संबुद्धानंद यांचें प्रतिनिधींस उद्देशून सुश्राव्य भाषण झालें. आध्यात्मिक दृष्ट्या अखेर जगांत भारताचें स्थान किती मानाचें व महत्त्वाचें आहे याची जाणीव करून देऊन स्वामीजी म्हणाले, ‘आध्यात्मिक दृष्ट्या पुढारलेला व आघाडीवर असलेला भारतासारखा दुसरा देश पृथ्वीच्या पाठीवर कुठेंहि सांपडणार नाहीं. या देशांत अवतारांची व संतमहात्म्यांची अखंड परंपरा अनादिकालापासून सुरू आहे. तिला खंड असा कधींच पडलेला नाहीं. त्यांनीं भारतांत देशसुधारणेची व जनतेची पातळी उच्च राखण्याची बहुमोल कामगिरी पार पाडिली आहे. या देशांत निरनिराळ्या काळीं जशीं अत्यंत उच्च पातळीवर गेलेलीं माणसें आढळतात तशीं व त्या प्रमाणांत तुम्हांला दुसऱ्या कोणत्याहि देशांत सांपडणार नाहींत.

‘आज ज्यांच्या नांवाचा जयजयकार करण्यासाठीं आपण येथें जमलों आहोंत ते श्रीसाईबाबा हे त्याच थोर कोटींतील महान् संत होत. त्यांनीं भेदभाव न ठेवतां जें कांहीं केलें तें सर्वांसाठीं केलें. आमची संस्कृति भेदभावरहित व सर्वव्यापी आहे. ती भेदाभेद मानीत नाहीं. वेदान्त धर्म हा सर्वसंग्राहक व सर्वव्यापी आहे. ‘सर्वं खल्विदं ब्रह्म’ हें आमच्या संस्कृतीचें महान् तत्त्व आहे. आणि त्याच तत्त्वाचें आचरण साईबाबांनीं आमरण केलें. सर्वांभूतीं समभाव ही शिकवण बहुमोलाची आहे व तीच तर त्यांच्या शिकवणीचा खंबीर पाया होता. इतर देशांनीं पायांशीं बसून धडे घ्यावे अशी आमची धर्मसंस्कृति आहे.

‘आमच्या मूलभूत शिकवणीचा आम्हांला विसर पडूं नये व ती जिवंत रहावी यासाठीं जर कोणी झटलें असेल तर ते म्हणजे वेळोवेळीं होऊन गेलेले थोर व सर्वश्रेष्ठ संतमहात्मेच होत. ते खरोखर महापुरुष होते. श्री साईबाबांनीं त्या दृष्टीनें केलेली कामगिरी अतिशय महत्त्वाची आहे व म्हणून आज या प्रसंगीं त्यांना भक्तिभावानें वंदन करणें हें आपलें कर्तव्य आहे.’

## ना. भाऊसाहेब हिरे यांचें भाषण

मुंबई सरकारचे महसूलमंत्री ना. भाऊसाहेब हिरे हे साईभक्तसंमेलनास पहिल्या दिवशीं त्याचप्रमाणें तिसऱ्या दिवशीं हजर राहिले होते.

ते आपल्या भाषणांत म्हणाले, 'श्री साईबाबा हे एक थोर सत्पुरुष होऊन गेले. आपण येथें सर्वजण त्यांचे भक्त या नात्यानें जमलां आहांत. देशाच्या निरनिराळ्या भागांतून असंख्य भक्त आले आहेत. मी या संमेलनास हजर रहात आलों तो केवळ त्यांचें तत्त्वज्ञान समजून घ्यावें याच उद्देशानें होय. मागें एकदां प्रवासांत असतांना शिरडी येथें जाऊन श्री साईबाबांच्या समाधीचें दर्शन घेण्याचें भाग्य मला लाभलें होतें.

'श्री साईबाबांनीं सद्धर्माचा आयुष्यभर प्रचार व आचार केला. या देशांत अनेक साधुसंत होऊन गेले, व त्यांनीं आपापल्या परीनें सद्धर्माचा प्रचार करून जनतेंत जागृति घडवून आणिली आहे. ईश्वर एक आहे, त्याचें वास्तव्य सर्वभूतीं आहे, मग त्याला तुम्ही कोणत्याहि नांवानें ओळखा, त्यांच्या तत्त्वास अनुसरून खरा धर्म कोणता, खऱ्या धर्माचें पालन करावयाचें म्हणजे काय व आपण कोणत्या रीतीनें वागलें असतां खऱ्या धर्माचें पालन केल्यासारखें होईल याचें सुरेख विवरण प्रा. वाडिया यांनीं आपल्या भाषणांतून केलें आहे. आपला बहुजनसमाज आकुंचित धर्मभावनांनीं व्यापलेला आहे. तो आकुंचितपणा सोडून आपण व्यापक व उदारमतवादीपणा स्वीकारला पाहिजे. आपण आपल्या आचरणानें धर्माला आकुंचित स्वरूप आणतां कामा नये. आज या देशाला व्यापक व उदार दृष्टिकोनांनीं पाहणारे व खऱ्या धर्माचें पालन करणारे नागरिक हवे आहेत.

'श्री साईबाबा हे उदारमतवादी व खऱ्या धर्माचें पालन करणारे व दुसऱ्याकडून करविणारे संत होते. त्यांचीं उदारमतवादी व परमतसाहिष्णुतावादी तत्त्वें आम्हीं आचरणांत आणिलीं असतीं तर आमचें कोटकल्याण झालें असतें.

'शिरडी येथें श्रीसाईबाबांच्या समाधिदर्शनास जाणाऱ्या भक्तांनीं त्यांची ही महत्त्वाची शिकवण नेहमीं लक्ष्यांत बाळगिली पाहिजे, व तिचें आचरण करण्यासाठीं त्यांनीं झटलें पाहिजे. श्रीसाईबाबांनीं धर्माला उजाळा आणिला व धर्माला उज्ज्वल स्वरूप प्राप्त करून दिलें. तो त्यांनीं आणून दिलेला उजाळा आपण झेलला पाहिजे. त्याला काळोखी फांसण्याचा प्रयत्न करतां कामा नये. तसेंच जनतेंत अंधश्रद्धा व सांप्रदायिकता बळावणार नाहीं याबद्दल आपण दक्षता बाळगिली पाहिजे. या श्रीसाई-भक्तसंमेलनाकडून एवढें कार्य घडलें तरी पुष्कळ झालें असें समाधान मानतां येईल.'

## ना. मुरारजी देसाई यांचें भाषण

श्री साईभक्तसंमेलनांत मुंबई प्रांताचे पंतप्रधान ना. मुरारजी देसाई यांनीं हजर राहून आपल्या भाषणाचा लाभ सर्वांना करून दिला. आपल्या भाषणांत ना. मुरारजी-भाई म्हणाले, 'श्री साईबाबांचें कार्य व त्यांची शिकवण फार उच्च कोटींतील आहे. समभावाची, जातिभेदाचे तट फोडणारी शिकवण ती उच्च कोटींतीलच असावयाची. त्यांच्या शिकवणीबद्दल मी आपणास काय सांगणार ? तुकडोजीमहाराजांनीं त्या बाबतींत

आपणास जें कांहीं सांगावयाचें तें सांगितलें आहे. आज आमचें कर्तव्य कोणतें याचीहि त्यांनीं तीव्रतर शब्दांत आपणांस जाणीव करून दिली आहे.

मी धर्मसंबंधीं संमेलनांत फारसा भाग घेत नाहीं व जातहि नाहीं. परंतु या संमेलनास हजर रहावें असें मला वाटलें. ज्या संतांचें आपण स्मरण करतों, त्यांची शिकवण आपल्याकडून आचरली जात आहे काय ? याचा आपण नेहमीं विचार केला पाहिजे. संतांचें नुसतें स्मरण करून काय उपयोग ? त्यांची शिकवण जर आमच्या हृदयाशीं जाऊन भिडली नाहीं तर आम्हांला त्या थोर पुरुषांचें गुणगान गाण्याचा अधिकार पोहोंचत नाहीं. आमच्यांत असंख्य दोष घर करून राहिले आहेत. ते दूर करण्यासाठीं जर आम्हीं झटलों नाहीं, दुर्गुण टाकून सद्‌गुणांची कास जर आम्हीं बद्धपरिकर धरली नाहीं तर संतांची वाणी आम्हीं कां म्हणून विटाळावी ? श्रीसाईबाबांचा अनुयायी होणें म्हणजे काय ? त्यांच्या शिकवणुकीची, त्यांच्या थोर गुणांची जोड आम्हीं आमच्या जीवनांत करून देण्यासाठीं अहोरात्र झटलें पाहिजे. तीच तळमळ सदैव आम्हांला लागून राहिली पाहिजे.

## संमेलनांत संमत झालेले ठराव

( १ ) मानव जातीच्या कल्याणासाठीं व जागतिक बंधुभावाच्या वृद्धीसाठीं श्री साईबाबांचा सोज्वळ संदेश व्यापक प्रमाणांत सर्वत्र पसरविण्यासाठीं सर्व प्रकारें शिकस्तीची उपाययोजना करण्यांत यावी.

( २ ) पहिल्या ठरावांत नमूद केलेला उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं व देशभर पसरलेल्या सर्व साईमंडळांचें कार्य एकछत्री व्हावें, तसेंच साई–चळवळींत एकसूत्रीपणा आणण्यासाठीं व साई–चळवळीचें कार्यक्षेत्र व्यापक करण्यासाठीं सर्व साईमंडळांचें एकत्रीकरण एका फेडरेशनच्या रूपानें करण्यांत यावें.

( ३ ) त्या फेडरेशनचे उद्देश पुढीलप्रमाणें असावेः—वार्षिक संमेलनाची योजना करून तें यशस्वी रीतीनें घडवून आणणें, कार्यांत सुसंघटितपणा आणण्यासाठीं तसेंच जोरदार व परिणामकारक प्रचार कार्यासाठीं नवीन साईमंडळें स्थापन करणें व अस्तित्वांत असलेलीं बळकट करणें, तसेंच हें कार्य जलद रीतीनें, सुसंथपणें व प्रभावी पद्धतीनें चालावें यासाठीं सर्वांकरितां सर्वसाधारण अशी एकच घटना तयार करणें.

( ४ ) पुढील गोष्टी पार पाडण्याबद्दल शिरडी संस्थानला विनंति करण्यांत यावीः—

( अ ) सर्व चालू भाषांत श्रीसाईबाबांचें अधिकृत चरित्र, त्यांची शिकवण व त्यांचें तत्त्वज्ञान यासंबंधीं वाङ्मय प्रसिद्ध करून तें कमींत कमी किंमतींत मिळण्याची व्यवस्था व्हावी.

( ब ) धर्म व तत्त्वज्ञान यासंबंधींचें सर्व उपलब्ध वाङ्मय कोणाहि वाचकास वाचावयास मिळावें व संशोधनकार्य सुलभतेनें पार पाडतां यावें यासाठीं एक मध्यवर्ती ग्रंथसंग्रहालय स्थापन करण्यांत यावें.

( क ) शिरडी येथें ज्यांना आध्यात्मिक प्रकाशाची तळमळ लागून राहिली आहे अशांसाठीं श्रीसाईबाबांच्या तत्त्वज्ञानाचा, त्यांच्या लीलांचा व शिकवणुकीचा सांगोपांग परिचय करून देण्यासाठीं एक आध्यात्मिक विद्यापीठ स्थापण्यांत यावें.

(ड) वैद्यकीय सल्लामसलत व औषधोपचार देशी व परदेशी पद्धतीनें सर्वांना सुलभतेनें मिळण्याच्या बाबतींत शक्य तेवढी सुधारणा व्हावी यासाठीं जरूर ती व्यवस्था करून शक्य तितक्या लौकर एक सॅनिटोरीयम (आरोग्यभवन) स्थापन करण्यांत यावें.

(५) शिरडी येथें श्रीसाईबाबांचें आगमन झाल्यास १९५८ सालीं शंभर वर्षें होत आहेत; तरी त्यांच्या आगमनाचा व शिरडी येथील वास्तव्याचा शतसांवत्सरिक महोत्सव भव्य प्रमाणांत साजरा करण्यासाठीं एव्हांपासून जरूर ती तयारी करण्यांत यावी.

(६) शिरडी संस्थानला आजच्या काळास अनुसरून व भावी काळांतील गरजा लक्ष्यांत घेऊन सुंदर व अद्यावत् स्वरूप देतां यावें यासाठीं तज्ञांच्या सहकार्यानें एक भव्य योजना तयार करवून घेण्याची शिरडी संस्थानाला विनंति करण्यांत यावी.

(७) शिरडीला दिवसेंदिवस महान् क्षेत्राचें व सांस्कृतिक केंद्राचें स्वरूप येऊं लागलें आहे हें लक्ष्यांत घेऊन शिरडीपर्यंत रेल्वेचा फांटा नेण्यांत यावा; तसेंच कोपरगांव रेल्वे स्टेशन व चितळी रेल्वे स्टेशनांतील प्लॅटफॉर्म उंच करून प्रवाशांचे त्रास शक्य तेवढे कमी करण्यासाठीं व इतर जरूर त्या सुखसोयी निर्माण करण्यासाठीं रेल्वे बोर्डाला भेटून जरूर ती व्यवस्था करविण्यांत यावी.

(८) शिरडी ते मनमाड थेट एस्. टी. च्या गाड्या नेण्याबद्दल तसेंच शिरडी येथें जी उतारूंची गर्दी होत असते ती कमी करण्यासाठीं कोपरगांव स्टेशन ते शिरडी या दरम्यान जादा व पुरेशा गाड्या सोडण्याबद्दल स्टेट ट्रॅन्सपोर्ट अधिकाऱ्यांस विनंति करण्यांत यावी.

(९) शिरडी व कोपरगांव स्टेशन येथें जरूर त्या सोईनिशीं जादा शेड्स उभारण्याबद्दल स्टेट ट्रॅन्सपोर्टला विनंति करण्यांत यावी.

(१०) वरील ठरावांच्या अंमलबजावणीसाठीं मुंबईत एक मध्यवर्ती कचेरी (ऑफिस) स्थापन करण्यांत यावी. व त्यासाठीं जरूर ती जागेची व इतर जरूर ती व्यवस्था करण्याबद्दल शिरडी संस्थानला विनंती करण्यांत यावी.

(११) या संमेलनकचेरीतर्फे शिरडी संस्थानला आश्वासनपूर्वक जाणविण्यांत यावें कीं, या संमेलनाच्या कार्यकारिणीचें कार्य संस्थानच्या कार्याला नेहमीं पूरकच होऊन राहील व संस्थानच्या अधिकारावर कोणत्याहि प्रकारें अतिक्रमण करण्यांत येणार नाहीं; किंवा कोणत्याहि प्रकारें ढवळाढवळ केली जाणार नाहीं.

(१२) या संमेलनाच्या आरंभकाळांत संस्थाननें जी पांच हजार रुपयांची उदार देणगी कार्यारंभ करण्यासाठीं दिली त्याबद्दल हें संमेलन संस्थानचे कृतज्ञतापूर्वक आभार मानीत आहे.

(१३) पुढील संमेलन शक्य तों गुजराथ प्रांतांत भरविण्यांत यावें.

(१४) हें संमेलन सर्व परीनें यशस्वी व्हावें यासाठीं ज्या ज्या कार्यकर्त्यांनीं व आश्रयदात्यांनीं मनोभावें मेहनत घेतली व परोपरीनें सहकार्य केलें त्या सर्वांचे अंतःकरण-पूर्वक आभार मानण्यांत येत आहेत.

(१५) या पास झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठीं एक कार्यकारी मंडळ व जरूर त्या पोटसमित्या नेमण्यांत याव्या.

# जप करण्याचे कांहीं राम-मंत्र

(१) ॐ श्रीराम जयराम जयजयराम।

(२ ॐ श्रीरामाय नमः।

(३) ॐ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः।

(४) श्रीराम राम रामेति रमे रामे मनोरमे।
सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने॥

(५) आपदामपहर्तारं दातारं सर्वसम्पदाम्।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम्॥

(६) आर्तानामार्तिहन्तारं भीतानां भीतिनाशनम्।
द्विषतां कालदण्डं तं रामचंद्रं नमाम्यहम्॥

(७) रामाय रामभद्राय रामचन्द्राय वेधसे।
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः॥

(८) ॐ श्रीरामः शरणं मम।

(९) ॐ श्रीसीतारामः शरणं मम।

(१०) ॐ श्रीरामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये।

(११) ॐ दाशरथे विद्महे सीतावल्लभाय धीमहि।
तन्नो रामः प्रचोदयात्॥

(१२) ॐ रामभद्र महेष्वास रघुवीर नरोत्तम।
भो दशास्यान्तकास्माकं रक्षां कुरु देहि श्रियं च ते॥

[ स्वामी शिवानंद यांच्या ' जप-योग ' ह्या ग्रंथांतून ]




## डिसेंबर १९५३ :—

**श्रीं**चे दर्शनास येणाऱ्या भक्त लोकांची रीघ मागील महिन्याप्रमाणेंच याहि महिन्यांत मोठ्या प्रमाणावर होती. अनेक भक्तांकडून श्रींस दक्षिणा व देणगी रूपानें वस्तू अर्पण करण्यांत आल्या. भक्तांचे धार्मिक विधी संस्थानतर्फे यथासांग पार पाडण्यांत आले.

या महिन्यांतील नवलविशेष म्हणजे शनिवार ता. १९।१२।५३ रोजीं संस्थान गवई यांचें दत्तजयंतीनिमित्त कीर्तन श्रींचे समाधिमंदिरांत झालें. बराच भक्तसमुदाय जमला होता. रात्रौ श्रींच्या रथाची गांवांतून मिरवणूक निघाली व नेहमींप्रमाणें रथासमोर गारुड–भारुडाचे कार्यक्रम झाले. संस्थान गवई यांचीं कीर्तनें दोन एकादश्या व: ज्ञानेश्वर पुण्यतिथीस झालीं.

संस्थानतर्फे नेमणूक करण्यांत आलेले ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर श्री. कैकिणी यांनीं आपल्या कामाचा ताबा ता. १३।१२।५३ पासून घेतला.

या महिन्यांत श्रींच्या समोर खालील कलावंतांनीं आपापल्या कलेची हजेरी दिली:–

**गायन**—(१) सौ. हिराबाई जव्हेरी आणि मंडळी, मुंबई (२) सय्यदभाई, बडोदा (३) पुनमचंद मोहनलाल, भुसावळ (४) परशुराम महादेव गंगवालेकर, बेळगांव (५) मास्टर मनोहर बर्वे आणि मंडळी, मुंबई.

**वादन** (बांसरी)—श्री. कृष्णचंद्र रघुनाथ टिपणीस, बांद्रा व (२) गणपतराव जाधव.

**भजन**—शिवदास रामजी शेजाळे, भजनी मंडळ, कुर्ला, (२) सौ. कमलम्मा, रायचूर, (३) माधवबुवा सुकाळे, पुणें व (४) श्री. राजाराम रघुनाथ देसाई, सांताक्रुझ.

**प्रवचन**—कोपरगांवचे मामलेदार रावसाहेब गायकवाड–ज्ञानेश्वरीवर प्रवचन; (२) श्री. दत्तात्रेय गणेश गोखले, दादर, विषय–तुलसीदास रामायण व (३) श्री. यशवंत महादेव मेहेंदळे, संस्थापक, रुपी स्कूल, दिल्ली दरवाजा, अहमदनगर, विषय–स्वावलंबन.

**कीर्तन**—ह. भ. प. चैतन्यबुवा शिंपी, कासारवाडी, जिल्हा परभणी; (२) सौ. सुधाबाई इनामदार, ठाकूरद्वार, मुंबई.

**नकला**—श्री. परशुराम काशिनाथ म्हात्रे, शीव, मुंबई.

भक्त लोकांची वाढती गर्दी लक्ष्यांत घेऊन पाण्याचे हौद मोठे करण्याचें व नळाऱ्या जास्त तोट्या बसविण्याचें काम संस्थानतर्फे हातीं घेण्यांत आलें आहे.

या महिन्यांत संस्थान दवाखान्यांत सुमारें १२०० रोग्यांवर उपचार करण्यांत आले. गोदावरी माता, संस्थान उपासनी महाराज–साकोरी, यांचेकडून सुमारें १४० रुपये किंमतीची एक फिरकी खुर्ची दवाखान्यास देणगीदाखल मिळाली. तसेंच श्री. बाजीराव कोते, पाटील शिर्डी, (२) श्री. सगुण मेरु नाईक, शिर्डी, (३) श्री. डी. पी. नगरकर कॉंट्रॅक्टर, हल्लीं मुक्काम शिर्डी व (४) एक साईभक्त, शिर्डी यांनीं प्रत्येकीं ५० रुपये व श्री. हरिभाऊ शेळके, शिर्डी व श्री. जनार्दन गणोरे, टांगेवाला, शिर्डी यांनीं प्रत्येकीं रु. २५ असे देणगीदाखल देऊन संस्थान दवाखान्यास २५० रु. किंमतीचें एक उत्तम प्रतीचें टेबल देणगी म्हणून दिलें.

शिरडीचें हवापाणी उत्तम होतें. रोज कडाक्याची थंडी पडत होती.

## जानेवारी १९५४:—

या महिन्यांत शिर्डीस श्रीसाईबाबांचे दर्शनास बाहेरगांवचे भक्त नेहमीप्रमाणें बरेच आले होते. या महिन्यांत ता. १४ ला मकरसंक्रांत हा सण आला होता. बरेच भक्त लोक या दिवशीं शिर्डीस येऊन श्रीसाईचे समाधीस अभिषेक पूजा वगैरे करून तिळगुळ अर्पण करितात; देणग्याही देतात. या महिन्यांत भक्तांनीं श्रीसाईंना देणग्या–गलेफ, कापड, वस्तू अशा बऱ्याच अर्पण केल्या आहेत. कलावंत लोक बरेच आले व त्यांनीं श्रीपुढें हजेरी दिली. त्यांत प्रसिद्ध सौ. हिराबाई बडोदेकर, सौ. सरस्वतीबाई राणे, श्री. फिरोज दस्तुर, मुंबई, श्री. जगन्नाथबुवा सुरतकर अशा भक्तमंडळींनीं गायन-कलेची हजेरी दिली. तसेंच कुमारी ललिता केशवराव वर्तक, खार, मुंबई, यांनीं मणिपुरी नृत्य हजेरी दिली. श्री. बापुजी अगस्ती, वकील, वर्धा, यांनीं श्रीमंदिरांत एक तास प्रवचन केलें. ता. २६।१।५४ रोजीं प्रजासत्ताकदिनानिमित्त श्रीसमाधि–मंदिरांत दिव्यांची रोषणाई, गायन, भजन, कार्यक्रम होऊन सर्वांना प्रसाद वांटण्यांत आला. संस्थान गवई यांचीं दोन कीर्तनें श्रीमंदिरांत झालीं. संस्थानतर्फें चालविण्यांत येत असलेल्या धर्मार्थ दवाखान्याचा फायदा २२२३ रोग्यांनीं या महिन्यांत घेतला. तसेंच दवाखान्यांत श्री. के. एम्. वर्तक, खार, मुंबई यांनीं १५० रुपये किंमतीचीं उपकरणें घेऊन दिलीं.

## फेब्रुवारी १९५४ :—

चालू महिन्यांत श्रीसाईबाबांचे दर्शनाकरितां बाहेर गांवचे भक्तलोक नेहमींप्रमाणें बरेच आले होते. श्रींचे समाधीवर निरनिराळ्या रंगाचे रेशमी सुती कापडाचे गलेफ, चादरी, कापड व इतर वस्तु देणगीरूपानें बऱ्याच आल्या. श्रीसमाधिमंदिरांत कलावंत, गायक, कीर्तनकार, कवी यांच्या हजेऱ्या झाल्या. ह्यांत सुरतचे रंजितबालकवी व हैद्राबाद (दक्षिण) चे श्री. वसंतराव तुळजापूरकर कवी, यांचें काव्यगायन झालें. गायक हुमणाबादचे श्री. न्हन्नेबाबू, मुंबईच्या श्री. इंदिराबाई कुडुंबळे, श्रीमतीबाई नार्वेकर यांचें गायन झालें. श्री. नारायणस्वामी माटुंगा यांनीं निरनिराळे वाद्यांचे आवाज तोंडांतून काढून दाखविले. तसेंच कु. नंदुशेट्टी, कु. डॉली कामत, कु. भारती नायंपल्ली,

मुंबई, यांनीं मणिपुरी नृत्य हजेरी दिली. तसेंच श्री. पार्वतीकुमार, श्री. मधुकर कामत, मुंबई, यांनीं श्रीकृष्ण-राधा-नृत्य हजेरी दिली. कु. गुलाब शेजवाडकर पुणें, नृत्य; कु. जयवंती शेजवाडकर, श्री. मधुकर शेजवाडकर, पुणें, गायन हजेरी दिली. श्री. ह. भ. प. गणपतिबुवा रामदासी कारंजा, श्री. ह. भ. प. नामदेवबुवा मुंबई, यांनीं कीर्तनाची हजेरी दिली. माघ शु. ११ व माघ व. ९ श्रीरामदासनवमी या दिवशी संस्थान गवई यांनीं दोन कीर्तनें केलीं. संस्थानतर्फे चालू असलेल्या धर्मार्थ दवाखान्याचा फायदा या महिन्यांत २०४० रोग्यांनीं घेतला. दवाखान्यास श्री. डी. डी. नेरॉय, मुंबई, यांनीं २५ रुपये देणगी दिली. शिर्डीयेथील हवापाणी उत्तम आहे.

**द. ब. राणे**
सं. चिटणीस, शिरडी संस्थान

# रथयात्रा

*रथयात्रा, लोकारण्य, महाधूमधाम—*
*भक्तेरा लुहाये पथे करिछे प्रणाम।*
*पथ भावे 'आमि देव' रथ भावे 'आमि'*
*मूर्ति भावे 'आमि देव' हासे अन्तर्यामी॥*

**—रवींद्रनाथ ठाकोर**

*रथयात्रेचा राजपथावर उत्सव तो होता।*
*भरला तेथें मानवसागर दर्शनास मोठा॥*
*गर्जत होता ढोल, चौघडा, जयजयकारध्वनी।*
*भक्तश्रेष्ठ तैं प्रणाम करिती नतमस्तक होउनी॥*
*राजपथाच्या मनांत आलें 'मीच देव आहें,।*
*प्रणाम करिती जन मजला हे, अन्य देव नोहे'॥*
*रथही बोले मनीं आपुल्या, 'मीच देव आहें'।*
*मूर्तीच्याही मनीं वाटलें, 'मीच देव आहें'॥*
*अंतर्यामीं वास करी जो एकमेव आत्मा।*
*भाव त्रयींचा जाणुनि हंसला मनांत परमात्मा॥*

अनुवादक— **भवानीशंकर नीळकंठ वागळे**, जोगेश्वरी

# श्रीसाई लीला 'त्रैमासिक' मिळण्याचीं ठिकाणें

(१) **श्री. बाबुराव डी. बागवे,**
चीफ एजंट, खटाव बिल्डिंग, गिरगांव नाका, मुंबई ४.

(२) **श्री. बोवलेकर,** दादर बी. बी. स्टेशन समोर, मुंबई.

(३) **श्री. सावळाराम खंडू दांगट,** बोरीबंदर, मुंबई.

(४) **श्री. इ. आर. मालपेकर,**
दागिन्यांचें दुकान, जितेकर चाळ, ठाकूरद्वार, मुंबई २

(५) **श्री भाऊ मोरोबा ढगे,**
टोप्यांचे व्यापारी, ठाकूरद्वार मुंबई २.

(६) **मेसर्स मनोहर बुक डेपो,**
गोखले सोसायटी लेन, पोयबावडी, परेल, मुंबई १२.

(७) **मेसर्स ठकार आणि कंपनी,**
कोहिनूर सिनेमा समोर, रानडे रोड, दादर, मुंबई २८.

(८) **धी बॉम्बे बुक डेपो,** गिरगांव. मुंबई ४,

(९) **मेसर्स सारंग बुक डेपो.**
मुनीम हाऊस, चिंचपोकळी, मुंबई १२.

(१०) **मेसर्स दातार आणि पुरोहित,**
वैद्यवाडा, बॉम्बे रोड, ठाणें.

(११) **मेसर्स मंगला वस्तु भांडार,**
आहिल्याबाई चौक, कल्याण.

(१२) **पनवेल न्यूज पेपर स्टॉल,** पनवेल

(१३) **श्री. भाऊसाहेब लोंबर,**
४०७|४०८ बुधवार पेठ, पुणें २.

(१४) **श्री साईप्रसाद मिना फोटोचा कारखाना.**
३३६, बुधवार पेठ, पुणें २.

(१५) **नाडकर्णी आणि कं.** ( स्पोर्टस् )
**खेळाच्या वस्तूंचे व्यापारी,** धोबीतलाव, मुंबई, २.

(१६) **श्री बाबुराव अण्णाराव चौगुले,**
२५२ ठळकवाडी, बेळगांव.

(१७) **प्रेमळ विठ्ठल मंदिर,** फणसवाडी, मुंबई २.

(१८) **श्री. वाय. एल. सावंत,** रहिमत बाई बि. ऑर्थर रोड,
ताडदेव, मुंबई ७. ( संस्थानचीं इतर पुस्तकेंही मिळतील. )

(१९) **विजयकुमार परफ्यूमरी स्टोअर्स,** कीर्तीकर मार्केट पहिली गल्ली,
**दुकान नं. १८ दादर, मुंबई.**

बाहेरगांवीं एजंट्स नेमणें आहे, तरी मुंबई ऑफिसच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.